रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १५
www.ramprahar.com

मंगळवार, १ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘देशाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जातोय’



**लखनऊ :** मणिपूरमध्ये पुन्हा शांतता प्रस्थापित होईल याची मला खात्री द्यायची आहे. प्रत्येक महिलेला आणि नागरिकाला सुरक्षा प्रदान करणे हे कोणत्याही सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. आमचे सरकारही या दिशेने काम करीत आहे, मात्र तेथील शांतता बिघडवण्याचा आणि देशाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जातोय. लोकशाही चिरडणाऱ्या लोकांचे हे षडयंत्र आहे, अशी टीका उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ केली आहे. ते एएनआय या वृत्तसंस्थेच्या पॉडकास्टमध्ये बोलत होते. गेल्या नऊ वर्षांत ईशान्येकडील राज्यांना मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे काम सरकारने केले आहे, मात्र या काळात शेजारील देशांनी कटकारस्थान केले, त्याचे पुरावेही मिळाले आहेत. जेव्हा एखादी यंत्रणा विनाकारण हस्तक्षेप करते, तेव्हा अशी परिस्थिती उद्भवते, असे ते म्हणाले.


### अंतरंग

उरणमध्ये पिसाळलेल्या कुत्र्यांचा १३ जणांना चावा/३

महाडमध्ये विनयभंगप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल/५

भारत-विंडीज संघांमध्ये आज निर्णायक वनडे/८


# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान



**पुणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी (दि. १) पुणे नगरीत येत असून त्यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या दौऱ्यात पंतप्रधान मोदींच्या हस्ते मेट्रोच्या नव्या मार्गिकांचे उद्घाटन, पंतप्रधान आवास योजनेतील गृहप्रकल्पांचे लोकार्पण, नव्या गृहप्रकल्पांची पायाभरणी यासह अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

### पुण्यात विकास प्रकल्पांचाही होणार शुभारंभ

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने देण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय पुरस्काराचे वितरण राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. पुरस्कार सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. पुणे दौऱ्यात पंतप्रधान मोदी सर्वप्रथम सकाळी ११ वाजता दगडूशेठ गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेणार आहेत. त्यानंतर ११.४५ वाजता त्यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे, तर १२.४५ मिनिटांनी ते मेट्रोसेवेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. २०१६मध्ये त्यांच्याच हस्ते या प्रकल्पाची पायाभरणी झाली होती. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत पिंपरी चिंचवड आणि पुणे महापालिकांकडून बांधण्यात आलेली घरे पंतप्रधानांच्या हस्ते हस्तांतरित करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर याच योजनेंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि पिंपरी चिंचवड महापालिकेद्वारे बांधण्यात येणाऱ्या घरांची पायाभरणीही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द

## अलिबागमध्ये तणाव; चार जण पोलिसांच्या ताब्यात

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द काढल्यामुळे रविवारी (दि. ३०) रात्रीपासून अलिबाग शहरात तणाव निर्माण झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून चार मुलांना ताब्यात घेतले आहे. त्यातील तिघे अल्पवयीन आहेत. अलिबागमध्ये सध्या तणावपूर्ण शांतता आहे.

तीन दिवसांपूर्वी एका खासगी शिकवणीच्या वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये वाद झाला. त्या वेळी काही मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द काढले. ही बाब सोशल मीडियावर व्हायरल झाली. या प्रकरणी रविवारी संध्याकाळी अलिबाग पोलीस ठाण्यात काही लोक जमले. त्यांनी शिवरायांबद्दल अपशब्द काढणाऱ्यांना अटक करण्याची मागणी केली. पोलिसांनी ताबडतोब चार तरुणांविरुद्ध गुन्हा नोंदवून त्यांना ताब्यात घेतले. **(पान २ वर..)**



### मुस्लीम समाजाकडूनही निषेध

अलिबागमधील मुस्लीम समाजाने सोमवारी सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घालून झालेल्या प्रकाराचा निषेध केला. हे करीत असताना मुस्लीम समाजाला शिवरायांच्या पुतळ्यास हार घालण्यास आक्षेप घेतला गेला. या प्रकरणी एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. वातावरण तापल्याने पोलिसांनी नंतर त्याला सोडले. मग वातावरण निवळले.

**छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काढलेल्या अवमानजनक वक्तव्याबद्दल अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कायदेशीर कारवाई पूर्ण झालेली आहे. जनतेने अफवांवर विश्वास ठेवू नये. शांतता राखावी.**
**–सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

## राज्यात पुन्हा जोरदार पावसाचा अंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने थोडीशी उसंत घेतलेली दिसत आहे. मुंबईतही तुफान हजेरी लावत जनजीवन विस्कळीत केल्यानंतर आता पावसाच्या हलक्या सरी कोसळत आहेत. दरम्यान, हवामान विभागाने पुढील पाच दिवसांत मुंबईसह अनेक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे तसेच संपूर्ण विदर्भासह कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पाऊस गायबच झाला आहे. दरम्यान हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईमध्ये मंगळवारपर्यंत हलक्या ते मध्यम सरी पडू शकतील. तसेच बुधवारी, गुरुवार व शुक्रवारी विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा

### पीक विमा भरण्यास तीन दिवसांची मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

पीक विमा भरण्यासाठी काही ठिकाणी तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने राज्य शासनाने केंद्र सरकारकडे याबाबत विनंती केली असता पीक विमा ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी आणखी तीन दिवसांची मुदतवाढ देण्यात आली असून आता ३ ऑगस्टपर्यंत पीक विमा भरता येणार असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी ट्विटरद्वारे दिली.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी एक रुपयात पीक विमा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली होती. आजपर्यंत राज्यात तब्बल एक कोटी पन्नास लाखपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी एक रुपयात आपला विमा अर्ज नोंदवून सहभाग घेतला आहे. मागील २४ तासांत सात लाख २० हजार शेतकऱ्यांनी विमा अर्ज भरला आहे, मात्र काही ठिकाणी सर्व्हर डाऊन होणे व तत्सम तांत्रिक अडचणी येत असल्याचा तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार शेतकरी कोणत्याही तांत्रिक बाबींमुळे विमा भरण्यापासून वंचित राहू नये या दृष्टीने ३ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी विहित वेळेत आपले विमा अर्ज नोंदवून घ्यावेत, असे आवाहन कृषीमंत्री मुंडे यांनी केले आहे.

ऑनलाईन फॉर्म भरताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेत निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

### निवडक

#### हरियाणामध्ये ब्रज मंडल यात्रेवर दगडफेक, जाळपोळ

**चंदिगड :** हरियाणाच्या नूंहमध्ये ब्रज मंडल यात्रेवर दुसऱ्या समाजाच्या लोकांनी सोमवारी (दि. ३१) दगडफेक केली तसेच तिथल्या गाड्यांना आग लावली. यामध्ये अनेक जण जखमी झाले आहेत. या तणावामुळे मंदिर परिसरात अनेक लोक अडकले. चिघळलेली परिस्थिती पाहून नूंह आणि हथीन येथील इंटरनेटसेवा बंद करण्यात आली आहे.

#### ऑस्ट्रेलियामध्ये आढळलेल्या रहस्यमयी तुकड्याबाबत खुलासा

**सिडनी :** भारताचे चांद्रयान ३चा चंद्राच्या दिशेने प्रवास सुरू आहे. १४ जुलै रोजी हे यान चंद्राकडे झेपावले होते. त्याच्या प्रक्षेपणानंतर काही दिवसांतच ऑस्ट्रेलियातील समुद्र किनाऱ्यावर रहस्यमयी वस्तू आढळून आली. ही वस्तू चांद्रयान ३शी संबधित असल्याचा दावा करण्यात आला होता. अखेरीस याचा खुलासा झाला झाला आहे. धातूची ही वर्तुळाकार आकाराची वस्तू म्हणजे भारतीय रॉकेटचे अवशेष असल्याचे समोर आले. या संदर्भात जगभरातील अंतराळ संस्थांशी संपर्क साधण्यात आला होता.




**पनवेल :** सफाई कामगार दिनानिमित्त राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या वतीने कामगार कर्मचारी मेळाव्याचे आयोजन सोमवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. या मेळाव्यास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस तथा पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख नितीन पाटील यांच्यासह राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## रायगडातील आपत्तीप्रवण गावांची माहिती केली जाणार गोळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी दरड दुर्घटनेनंतर रायगड जिल्ह्यातील आपत्तीप्रवण गावांची इत्यंभूत माहिती जिल्हा प्रशासन गोळा करणार आहे. त्यासाठी डिझास्टर अलर्टनेस डाटा (डॅड) उपक्रम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

महसूल सप्ताहाच्या निमित्ताने डिझास्टर अलर्टनेस डाटा उपक्रम हाती घेतला आहे. आपत्तीप्रवण गावांची संपूर्ण माहिती या निमित्ताने जिल्हा प्रशासनाकडे राहील. एखाद्या गावात आपत्ती आल्यास त्यानंतर उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे यामुळे सोपे जाणार आहे. सध्या केवळ आपत्तीप्रवण गावांसाठीच हा उपक्रम राबवला जाणार आहे. भविष्यात जिल्ह्यातील सर्वच गावे यात समाविष्ट करता येतील.

इर्शाळवाडीतील दुर्घटनेनंतर या आपत्तीची माहिती काही नातेवाईकांपर्यंत पोहचायला दोन दिवस लागले. म्हणून आपत्तीप्रवण गावातील रहिवाशांच्या नातेवाईकांची माहितीदेखील संकलित केली जाणार आहे, जेणेकरून नातेवाईकांचा शोध घेऊन त्यांना तातडीने त्याची माहिती पोहचवता येऊ शकेल. नातेवाईकांचे पत्ते आणि फोन नंबर मिळवून आपत्तीची माहिती त्यांना तातडीने पाठवण्यासाठी सॉफ्टवेअर तयार केले जात असल्याचेही जिल्हाधिकारी डॉ. म्हसे यांनी सांगितले.

जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या भूवैज्ञानिकांमार्फत रायगड जिल्ह्यातील संभाव्य दरडग्रस्त गावांचे सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यानुसार जिल्ह्यात आपत्तीप्रवण गावांची संख्या १०३ इतकी असल्याचे समोर आले होते. **(पान २ वर..)**

## जयपूर-मुंबई पॅसेंजर एक्स्प्रेसमध्ये आरपीएफ जवानाकडून गोळीबार

### चार जणांचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

जयपूर-मुंबई सुपरफास्ट पॅसेंजर एक्स्प्रेसमध्ये सोमवारी (दि. ३१) पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास गोळीबाराची धक्कादायक घटना घडली. आरपीएफ जवानाने केलेल्या या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला आहे. गोळीबारानंतर आरोपी चालत्या रेल्वे गाडीतून उडी मारून फरार झाला होता. त्याला भाईंदरमध्ये अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार जयपूर-मुंबई (गाडी क्र. १२९५६) ही सुपरफास्ट पॅसेंजर एक्स्प्रेस मुंबई सेंट्रलकडे जात होती. तेव्हा सकाळी साडेपाचच्या सुमारास गाडीत सुरक्षेच्या कारणास्तव कार्यरत असलेला आरपीएफ जवान चेतन सिंह याने एएसआय टिकाराम मीना यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात टिकाराम यांच्यासह अन्य तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

गोळीबार केल्यानंतर बोरिवली स्थानकापूर्वी गाडीचा वेग मंदावल्यानंतर आरपीएफ जवान चेतन गाडीमधून उडी टाकून फरार झाला होता. यानंतर ही गाडी मुंबई सेंट्रल स्थानकात पोहचल्यावर चार



जणांचे मृतदेह शताब्दी रुग्णालयात नेण्यात आले, तर फरार आरोपीला भाईंदरमध्ये अटक करण्यात आली आहे.

याबाबत रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरपीएफ जवानाने गोळीबार केल्याची माहिती सकाळी ६ वाजता आम्हाला मिळाली. या घटनेनंतर आमचे अधिकारी घटनास्थळी पोहचले. मृतांच्या कुटुंबीयांशी संपर्क करण्यात येत आहे.

लोहमार्ग पोलीस आयुक्त रवींद्र शिसवे यांनी पत्रकार परिषद घेऊन घटनाक्रम सांगितला, मात्र प्रकरण अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात असल्याने चेतन सिंहने गोळीबार का केला याबद्दल आता माहिती देता येणार नसल्याचे स्पष्ट केले.

# आजपासून मत्स्य हंगाम पुन्हा सुरू

## खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी बोटी सज्ज

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्यात १ जून ते ३१ जुलै हा मासेमारी बंदीचा कालावधी समाप्त झाला आहे. आता पुन्हा नव्याने मासेमारी करण्यासाठी मच्छीमार सज्ज झाले आहेत. मुरूड तालुक्यात सुमारे ७५० छोट्या मोठ्या होड्या मासेमारीसाठी खोल समुद्राकडे रवाना होतील.

मच्छीमार बांधवांनी दोन महिन्यांपासून बोटी किनाऱ्याला शाकारून ठेवल्या होत्या. या बोटींवरील आच्छादन काढण्यात आले असून इंजिन, जाळी यांची पडताळणी केल्यानंतर आता बोटी खोल पाण्यात मासेमारीसाठी जातील.



### मल्हार मार्तंडाला साकडे

कोळी समाज हा धार्मिक परंपरा जपणारा असून समुद्रात होड्या लोटण्यापूर्वी मल्हार मार्तंड देवाला कौल लावण्याचा प्रघात आहे. समुद्रात भरपूर मच्छी मिळू दे आणि नुकसान टळू दे, अशी मनोभावे प्रार्थना केली जात आहे.

यंदाचा मत्स्य हंगाम चांगला जावा व मुबलक मासे मिळावेत या अपेक्षेने मच्छीमार नवीन आशा घेऊन खोल समुद्रात जाताना दिसणार आहेत. मागील दोन वर्षांपासून मुबलक मासळी न मिळाल्याने कर्जाचा बोजा वाढला आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामावर मच्छीमारांच्या खूप अपेक्षा आहेत.

या संदर्भात माहिती देताना मुरूड तालुका मत्स्य विकास व परवाना अधिकारी तुषार वाळुंज यांनी सांगितले की, मासेमारीला सुरुवात होत असली तरी वाऱ्याचा वेग, खवळलेला समुद्र याचा अंदाज घ्यावा आणि स्वतः सुरक्षित राहून मासेमारी करावी. त्याचप्रमाणे मच्छीमारांनी प्लास्टिकचा वापर करू नये, कारण खोल समुद्रात टाकलेले प्लास्टिक साहित्य हे समुद्र किनारी येत असते.

रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, १ ऑगस्टपासून किमान ४० टक्के बोटी मासेमारी करणार आहेत, तर उर्वरित काही बोटी मुहूर्त काढून समुद्रात मासेमारीसाठी जातील.




**पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा सांस्कृतिक सेलच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार व प्रतिपक्ष या सुप्रसिद्ध युट्यूब चॅनेलचे सर्वेसर्वा भाऊ तोरसेकर यांचे जाहीर व्याख्यान रविवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आले होते. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, दीपक बेहेरे, माजी महापौर कविता चौतमोल, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन व्यासपीठावर उपस्थित होते. (वृत्त पान ३ वर..)**

# धर्मवीर आनंद दिघे कॅन्सर हॉस्पिटलचे भूमिपूजन

## अनेक मान्यवरांची सोहळ्यास उपस्थिती

**ठाणे : प्रतिनिधी**

आज माझ्या गुरुचे नाव या हॉस्पिटलला दिले आहे, हा माझ्या दृष्टीने महत्त्वाचा क्षण आहे. धर्मवीर आनंद दिघे कॅन्सर हॉस्पिटल हे केवळ ठाणे जिल्ह्यासाठी नव्हे तर संपूर्ण राज्यासाठी देखील महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. ३०) येथे केले.



टाटा मेमोरियल सेंटर, ठाणे महानगरपालिका आणि जितो ट्रस्ट यांच्या संयुक्त प्रयत्नातून बाळकूम रोड (ग्लोबल हॉस्पिटल) ठाणे येथे धर्मवीर आनंद दिघे कॅन्सर हॉस्पिटल व त्रिमंदिर संकुलाचा भूमिपूजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत व दादा भगवान फाउंडेशनचे दीपक देसाई यांच्या हस्ते रविवारी (दि. ३०) झाले. त्या वेळी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील, राज्य उत्पादन शुल्कमंत्री तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्हा पालकमंत्री रवींद्र चव्हाण, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, राहुल शेवाळे, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार, ठाणे महानगरपालिका आयुक्त अभिजित बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे प्रख्यात वैद्यकीय कॅन्सरतज्ज्ञ डॉ. शैलेश श्रीखंडे, महसूल, पोलीस व इतर शासकीय विभागातील वरिष्ठ अधिकारी, व्यापार, सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, राज्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम अतिशय महत्त्वाचा आहे. औषधोपचाराबरोबरच आशिर्वाद व प्रार्थनेचीही गरज असते. या हॉस्पिटलच्या नावातच आनंद आहे. ज्यांनी आयुष्यामध्ये फक्त इतरांच्या आनंदाचाच विचार केला, दुसऱ्याचा आनंद हाच आपला आनंद मानला. दुसऱ्यांचे दुःख कमी करण्याचे काम केले, अशा धर्मवीर आनंद दिघेंचे नाव या कॅन्सर हॉस्पिटलला देण्यात आले आहे. हा क्षण माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. या हॉस्पिटलसाठी शासनाकडून सर्व प्रकारची मदत केली जाईल.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, ठाण्यात धर्मवीर आनंद दिघे कॅन्सर हॉस्पिटलचे निर्माण करण्यात येत आहे, याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. राजकारणापेक्षा सेवा करणारा नेता म्हणून धर्मवीर आनंद दिघे यांच्याकडे पाहिले जात होते. त्यांचा वारसा मुख्यमंत्री शिंदे पुढे नेत आहेत. जितो ट्रस्टच्या माध्यमातून चांगले काम होत आहे. ज्याच्या मागे जितो आणि जैन समाज आहे, त्याच्याकडे संसाधनांची कमतरता भासत नाही. या ट्रस्टच्या माध्यमातून देशभरात मोठ्या प्रमाणात सेवाकार्य होत आहे. या हॉस्पिटलमध्ये आलेला रुग्ण बरा होऊनच जाईल, असा विश्वास आहे.

सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले की, आजच्या काळाची गरज उत्तम शिक्षण आणि आरोग्य या गोष्टी आहेत. सध्याच्या काळात कॅन्सर हॉस्पिटल असणे आवश्यक आहे. मानवाची बदलती दिनचर्या (लाईफ स्टाईल) आणि सायकोसोमॅटिक आजारांमुळे हे सगळे होत आहे. कॅन्सर हॉस्पिटल हे सेवा कार्य आहे. केवळ लाभासाठी काम करण्याची भावना ठेवल्यास लाभ होत नसतो. चांगले केले तरच चांगले होईल, यावर विश्वास ठेवायलाच हवा. सर्वांच्या आयुष्यातून दुःख जाण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जितो एज्युकेशन व मेडीकल ट्रस्टचे अध्यक्ष अजय आशर यांनी केले. त्यांनी जितो एज्युकेशन व मेडिकल ट्रस्टने विविध क्षेत्रात केलेल्या सेवाकार्याची माहिती चित्रफितीच्या माध्यमातून दिली. या हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या आरोग्य सोयीसुविधांसह ६००हून अधिक खाटांचे नियोजन करण्यात येणार असून गरजू कॅन्सरग्रस्त रुग्णांना अत्याधुनिक क्रोटॉन थेरपीचीही सुविधा तसेच रुग्णांबरोबर येणाऱ्या नातेवाईकांसाठी अत्यल्प दरात भोजन व्यवस्थादेखील असणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

# कोकण विभागात ३२ लाख ४२ हजार रोपे सवलतीच्या दरात विक्रीसाठी उपलब्ध

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातील जिल्ह्यांमध्ये असलेल्या २५ रोपवाटीकांमध्ये ३२ लाख ४२ हजार रोपे सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत. १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत वनमहोत्सव साजरा केला जात असून नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

जून ते सप्टेंबर हे पावसाचे महिने असल्याने या कालावधीत वृक्षलागवड केल्यास त्यांना नैसर्गिकरित्या मुबलक स्वरुपात पाणी मिळते त्यामुळे लागवड केलेली रोपे सहजतेने जगतात. या कालावधीत जनतेला वनीकरणाचे महत्त्व पटावे, वृक्षलागवडीबद्दल उत्साह वाढावा, नागरिकांनी जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षलागवड करावी या उद्देशाने वनविभागामार्फत सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध करून वन महोत्सव साजरा केला जातो. कोकण विभागातील समाजिक वनीकरण वृत्त ठाणे अंतर्गत येणाऱ्या ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या भागांमध्ये १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत वनमाहेत्सव साजरा करण्यात येत आहे.

या वनमहोत्सवात सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध आहेत. यामध्ये नऊ महिन्याचे अ दर्जाचे एक रोप जे सर्वसाधारण कालावधीत ३१ रुपयांत मिळते ते रोप या वन महोत्सवादरम्यान २० रुपयांत उपलब्ध आहे. ब दर्जाचे २५ रुपयांत मिळणारे रोप १२ रुपयांत, क दर्जाचे २३ रुपयांत मिळणारे रोप १० रुपयांत उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे १८ महिन्यांचे अ दर्जाचे एक रोप जे सर्वसाधारण कालावधीत ७९ रुपयांत मिळते ते रोप ५० रुपयांत, ब दर्जाचे ६३ रुपयांत मिळणारे रोप ३० रुपयांत, क दर्जाचे ५७ रुपयांत मिळणारे रोप २५ रुपयांत उपलब्ध आहे, तसेच १८ महिन्यांवरील अ दर्जाचे एक रोप जे सर्वसाधारण कालावधीत १३५ रुपयांत मिळते ते रोप ६५ रुपयांत, ब दर्जाचे १०३ रुपयांत मिळणारे रोप ५० रुपयांत, क दर्जाचे ९२ रुपयांत मिळणारे रोप ४० रुपयांत उपलब्ध आहे. या वर्षी रोपे निर्मितीवेळी, बियाणांचा स्त्रोत, बियाणांची प्रतवारी व उपचार, रोपांची सुदृढता या सर्व गोष्टींवर विशेष लक्ष दऊन कृषि तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही रोपे तयार करण्यात आली आहेत.

ठाणे जिल्ह्यात नऊ, रायगड सहा, रत्नागिरी आठ आणि सिंधुदूर्ग दोन अशा कोकण विभागात एकूण २५ रोपवाटीका उपलब्ध आहेत. या सर्व रोपवाटींकांमध्ये एकूण ३२ लाख ४२ हजार रोपे विक्रीसाठी तयार करून ठेवण्यात आली आहेत.

ज्या शासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींना वृक्ष लागवड करावयाची आहे. अशा यंत्रणांकडे रोप निर्मितीसाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद नसल्यास, अशा यंत्रणांना या वनमहोत्सव कालावधीत रोपांचा मोफत पुरवठा संबंधित रोपवाटिकेत केला जाईल. यासाठी अशा यंत्रणांनी लागणाऱ्या रोपांची आगाऊ मागणी उपवनसंरक्षक (प्रादेशिक) किंवा विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग यांच्याकडे विहित मागणीपत्राद्वारे करावी.

वन महोत्सवादरम्यान उपलब्ध असलेल्या सवलतीच्या दरातील रोपांची खरेदी करून खासगी मालकीचे पडीक क्षेत्र, शेत बांधावर, रेल्वे दुतर्फा, कालवा दुतर्फा, रस्ते दुतर्फा क्षेत्रात, सामुहिक पडिक क्षेत्र, गायरान क्षेत्र अशा ठिकाणी जास्तीत जास्त नागरिकांनी वृक्षलागवड करावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

# कुडाळदेशकर आद्यगौड ब्राह्मण समाजातर्फे आदिवासींना शिधावाटप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील कुडाळदेशकर आद्यगौड ब्राह्मण समाज संस्थेच्या वतीने सामाजिक उपक्रमांर्तगत आदिवासी बापदेव वाडी, गाढेश्वर येथील ३५ कुटुंबांना शिधावाटप करण्यात आले.

बांधकाम व्यावसायिक व कुडाळदेशकर आद्यगौड ब्राह्मण समाज संस्थेचे अध्यक्ष मंगेश परुळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बापदेव वाडी समाज मंदिरात ३५ कुटुंबांना तांदूळ, डाळ, तेल व इतर वस्तू आदी शिधाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मंगेश परुळेकर, उपाअध्यक्ष नंदा नाईक, सचिव यतीन ठाकुर, खजिनदार विनायक तिरोडकर व कुडाळदेशकर आद्य गौडब्राम्हण, पनवेलचे सर्व सभासद यांच्यासह बापदेववाडीतील पुरुष, महिला तसेच लहान मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मंडळातर्फे वाडीसाठी लोकांच्या गरजा ओळखून त्याना भविष्यातही अशा प्रकारची मदत करू, असे सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माधुरी प्रभू यांनी केले.





# ‘सीकेटी’त अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि. ३१) बारावीच्या विद्यार्थ्यांकडून अकरावी कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे अतिशय उत्साहात स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संजय भगत संचालक जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, माध्यमिक इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, माध्यमिक मराठी विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे व पारधी उपस्थित होत्या.



सानिका जाधव, फरीदा दळवी, प्रीती त्रिपाठी, समृद्धी पुरोहित या बारावीच्या विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचे संपूर्ण निवेदन केले. अकरावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापनातील सर्व विषयांची माहिती तसेच अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांचीही ओळख करून दिली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात संजय भगत यांनी, विद्यार्थ्यांना आपला आत्मविश्वास कसा वाढेल? आपण यश कसे मिळवू शकतो? यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लालबहादूर शास्त्री सचिन तेंडुलकर, एपीजे अब्दुल कलाम, पाणिनी यांच्या आदर्शाची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना यश मिळविण्याची प्रेरणा दिली.

प्राचार्य प्रशांत मोरे यांनी, विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास करण्यासंबंधी आवाहन केले त्यासाठी त्यांनी विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांची मने जिंकली. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी, आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना भविष्यातील वाढती स्पर्धा व त्यात टिकून राहण्यासाठी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे तसेच विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. उच्च माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी वृंद या कार्यक्रमास उपस्थित होते. विद्यार्थ्यांतर्फे आकांक्षा सिंग व सायली कोळी यांनी तर शिक्षकांतर्फे पल्लवी दिवेकर व ज्योती वाघ यांनी आपापली मनोगते व्यक्त केली.

पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

पान १ वरून

## छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द काढल्याची माहिती समजताच मोठ्या प्रमाणावर तरुण अलिबाग येथील महाराजांच्या पुतळ्याजवळ जमा झाले. त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे वातावरण तंग झाले होते. अटक केलेल्या मुलांना या पुतळ्याजवळ आणून त्यांना जाहीर माफी मागायला सांगा, अशी मागणी जमलेल्या तरुणांनी केली.

याची माहिती मिळताच आमदार महेंद्र दळवी व माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ आले. त्यांनी पोलिसांशी तसेच तरुणांशी चर्चा केली. याबाबत रायगड पोलीस अधीक्षकांशी चर्चा करून त्यानंतर निर्णय घेऊ असे सांगितल्यानंतर जमाव पांगला. सर्वपक्षीय नेत्यांनी सोमवारी सकाळी ११ वाजता पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासमवेत चर्चा केली. कायद्यानुसार दोषींवर कारवाई करण्यात आली आहे. जे काही होईल ते कायद्यान्वये होईल, असे पोलीस अधीक्षक घार्गे यांनी या वेळी सांगितले.

या घटनेप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले असून त्यापैकी तिघे अल्पवयीन आहेत. त्यांना कर्जत येथील बालसुधारगृहात पाठवण्यात येणार आहे, तर उर्वरित एकाला अटक करण्यात आली आहे. सध्या अलिबागमध्ये वातावरण शांत आहे, मात्र सर्व व्यवहार सुरळीत सुरू असून शहराच्या प्रमुख भागांत पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**२० व्हॉटस्ॲप ग्रुपवर हस्तक्षेप**

या घटनेनंतर रायगड जिल्ह्यात २० व्हॉटस्ॲप ग्रुप तयार करण्यात आले होते. ही बाब लक्षात येताच सायबर सेलला रात्रीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षकांनी दिले. रात्रभर कारवाई करीत पोलिसांनी या सर्व व्हॉटस्ॲप ग्रुपवरील मजकुराच्या प्रसारावर नियंत्रण आणले. हे ग्रुप तयार करणारे आणि त्यांचा प्रसार करणाऱ्यांची माहिती संकलित केली. त्यांना रातोरात फोन करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या क्लिप्स आणि मजकूर हटविण्याचे तसेच प्रसार थांबवण्याचे निर्देश पोलिसांनी दिले. त्यामुळे पहाटेपर्यंत सर्व व्हॉटस्ॲप ग्रुपवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. सोशल मीडियावरील मजकुरावर पोलिसांची नजर असल्याचेही जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी म्हटले आहे.

## रायगडातील आपत्तीप्रवण गावांची माहिती केली जाणार गोळा

इर्शाळवाडी दरड दुर्घटनेनंतर या वाडीत किती लोक राहत होते याची निश्चिती करताना खूप अडचणी आल्या. आपत्तीनंतर या बाबी निश्चित करणे कठीण होऊन बसते. ही बाब लक्षात घेऊन ‘डॅड’ हा उपक्रम राबवला जात आहे.

जिल्ह्यातील आपत्तीप्रवण गावातील कुटुंबांची माहिती, त्या कुटुंबात किती व्यक्ती आहेत, किती व्यक्ती मृत झाल्या आहेत, त्यांची शेतजमीन व इतर मालमत्ता, रेशन कार्ड, बँक खाते नंबर, जातीचा प्रवर्ग, घरांची स्थिती, पाळीव जनावरे, वाहने, घरातील इतर वस्तू अशी सर्व माहिती गोळा केली जाणार आहे. हे डॅड कार्ड जिल्हा प्रशासनाबरोबरच प्रत्येक कुटुंबाकडेही असेल. याचा उपयोग नुकसानभरपाई देताना होणार आहे. त्याचप्रमाणे आपत्तीमध्ये मृत किंवा बेपत्ता व्यक्तींची अचूक माहिती मिळण्यासाठी होणार आहे. आपत्तीमध्ये जी बालके अनाथ होतात त्यांना कुटुंबाची माहिती देता येत नाही. अशावेळी ही माहिती उपयोगात येणार आहे, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

# वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप कार्यकर्ते राजूभाई बगाटे यांच्या वाढदिवसानिमित्त मालधक्का वसाहत येथे गरीब गरजू विद्यार्थ्यांना वह्यावाटप करण्यात आल्या.

या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, विक्रांत डिंगोरकर, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे पनवेल तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात, बुथ कमिटी ४२८चे भाजप कार्यकर्ते दीपक वाहुळकर, राजू झिरे, सर्जेराव साळवे, किरण वाहुळकर, विजय झिरे, सनी साळवे, अनिकेत खरात, गणेश झिरे, आनंत वाहुळकर, अजय जाधव, विशाल घुले, भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, सचिन जाधव, समिर शेख आदी उपस्थित होते. वाढदिवस साजरा केल्यानंतर गोरगरीबांना जेवण देण्यात आले.

# तुपगावमध्ये मोफत पाच लाखांचा विमा, आयुष्यमान भारत कार्डचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भाजप तुपगाव व हिराबाई कुंभार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने २९ व ३० जुलै रोजी तुपगांव येथील संत गोरोबाकाका मंदिर येथे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री विमा आरोग्य योजना नोंदणी शिबिर ग्रामपंचायतीचे प्रथम लोकनियुक्त सरपंच रवींद्र कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. शिबिरामध्ये प्रत्येक कुटुंबासाठी मोफत पाच लाखांचा आरोग्यविमा व आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले.



या वेळी तुपगांव गावातील ५१७ लोकांनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदवून आयुष्यमान भारत कार्ड बनवून घेतले व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री योजनेचे नवीन १० कार्डवाटप करण्यात आले आहेत. या वेळी तुपगांव ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुयोग भालेकर, ग्रामपंचायत सदस्य सचिन साखरे, कांता नागावकर, भाजप आरोग्य सेल अध्यक्ष खालापूर तालुका विजय ठोसर, माजी तंटामुक्ती अध्यक्ष योगेश गुरव, कुंभार समाज अध्यक्ष युवक स्वप्निल नागावकर, देवेंद्र कुंभार, नागेश खरात, यशवंत बिरवाडकर, गिरीष गुरव, हितेश साळवी, सचिन साळवी यांनी विशेष सहकार्य केले. अनेक ग्रामस्थांचे आधार कार्ड लिंक नसल्यामुळे त्यांना हे आयुष्यमान भारत कार्ड मिळू शकले नाही अशा ग्रामस्थांसाठी सरपंचांनी निर्णय घेऊन ५ व ६ ऑगस्ट रोजी तुपगांव येथे आधार कार्डसंबंधी शिबिर आयोजित केले आहे. त्यामध्ये जे काही आधार कार्ड संबंधित दुरूस्ती असतील, नवीन करणे असेल आधार कार्डला काही केवायसी लिंक करायचे असतील, लहान मुलांचे आधार कार्ड अपडेट करायचे असेल सर्व शिबिर तेथे होणार आहे.

# कर पुनर्निरीक्षण मोहिमेस नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद; ४ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मालमत्ताधारकांच्या आग्रहास्तव पनवेल महापालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या विशेष पुनर्निरिक्षण मोहीमेमध्ये वाढ करण्यात आली आली असून ४ ऑगस्टपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तत्काळ नावात दुरूस्त्या करून सुधारित देयके दिल्याने नागरिकांनी आभार मानले आहे.

पनवेल महापालिकेच्या वतीने मालमत्ता कर विभागामार्फत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत कर पुर्ननिरीक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांचा या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे नागरिकांच्या आग्रहास्तव या मोहिमेमध्ये मुदतवाढ करण्यात आली असून ४ ऑगस्टपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे.

सोमवारी (दि. ३१) सुमारे १३४ नागरिकांनी आपल्या बिलामध्ये दुरूस्ती करून घेतली. उपायुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली आलेल्या अर्जाची पडताळणी करून मालमत्ता कर विभाग प्रमुख सुनील भोईर, लिपिक महेश गायकवाड आणि कर्मचारी हे तातडीने दुरूस्ती करून देत आहेत.



# नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होतील!

## ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांचे प्रतिपादन






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यक्षम पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या विकासासाठी दिवसरात्र काम करीत आहेत, त्यामुळे येत्या लोकसभेच्या निवडणुकीत ३२५ ते ३५० जागा जिंकून नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होतील, असा विश्वास ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी पनवेल येथे झालेल्या व्याख्यानातून केली. त्याचबरोबर विरोधक फक्त विरोधाचे राजकारण करून जनतेची दिशाभूल करीत आहेत, अशी खरमरीत टीकाही त्यांनी या वेळी केली.

भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने रविवारी (दि. ३०) सायंकाळी ५ वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सुप्रसिद्ध पत्रकार व प्रतिपक्ष या सुप्रसिद्ध युट्यूब चॅनेलचे सर्वेसर्वा भाऊ तोरसेकर यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजप सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन व टीमने या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन केले होते. व्याख्यानाला पनवेलच्या नागरिकांनी तसेच 'भाऊ' प्रेमींनी उदंड प्रतिसाद दिला.

व्याख्यानाचा विषय होता 'बदलता भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींचे योगदान' भाऊ तोरसेकर ह्यांनी त्यांच्या शैली मध्ये अनेक उदाहरणं, प्रसंग, किस्से सांगत देशात घडत असेलेल्या विविध घडामोडींवर भाष्य केले. नरेंद्र मोदी ह्यांची कार्यपद्धती, कामाप्रति व देशाप्रति असलेला त्यांचा प्रामाणिक पणा, चिकाटी या बाबत सामान्य नागरिकांच्या मनातील भावना सांगितल्या. आज देशात वेगाने रास्ते बांधले जात आहेत, वेगाने इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहत आहेत. ज्याचे भूमीपूजन केले त्याचे उद्घाटन ही चार ते पाच वर्षाच्या आत केले आणि असे करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताच्या इतिहासातले कदाचित एकमेव पंतप्रधान असतील, असे भाऊ म्हणाले.

**पनवेलमध्ये व्याख्यानाला उदंड प्रतिसाद**

आज जगात भारत हा दहाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. देशात लोकांना एक प्रकारे जिंकण्याची सकारात्मक ऊर्जा जर कुठून मिळत असेल तर त्याचा स्त्रोत हा नरेंद्र मोदी आहे, असे ते म्हणाले.

विरोधी मानसिकतेमुळे देशाचे खच्चीकरणाचे काम विरोधकांकडून होत असल्याचे सांगतानाच हे देशासाठी दुर्दैवी असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. ज्यांच्या काळात निरव मोदी, विजया मल्ल्या बँक बुडवून गेले ते आता स्वस्थ बसले आहेत आणि परत शहाणपण शिकवत आहेत. असे नमूद करतानाच आपण जे बघतो पण त्याची वस्तुस्तिथी काय आहे हे बघत नाही याचा संताप येतो. सरकार यशस्वीपणे चालवायचे असेल तर त्यात लोकांचा सहभाग असावा लागतो आणि हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करून दाखवले आहे. त्यामुळेच सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहचल्या आहेत, असेही त्यांनी अधोरेखित केले. भारताच्या शेजारील देश अन्नधान्यासाठी धडपडत आहेत, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी देशातील ८० कोटी लोकांना गेली तीन वर्षे धान्य देत आहे. आणि अशा अनेक योजना सक्षमपणे राबविण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यशस्वी झाले आहेत. प्रत्येक वेळी विरोध आणि टीका हा विरोधकांचा जीवनाचा भाग झाला आहे, त्यामुळे कुठल्याही बाबीला लोकांच्या भावना काय आहेत हे न बघता स्वार्थपणा करणे चुकीचे आहे आणि विरोधक नेमकेच तेच करत आहेत. सास बहूच्या सिरीयल जशा काल्पनिक असतात त्याचप्रमाणे राहुल गांधी, सोनिया गांधी यांचे राजकारण आहे असे सांगतानाच सामान्य घरातील नरेंद्र मोदी कष्टाने पुढे आले आहेत त्यामुळे त्यांना सामान्य तळागातील लोकांची जाण आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. इर्शाळगडावर झालेल्या दुःखद दुर्घटनेची संवेदनशीलता मोठी होती पण परवा इर्शाळगड येथे माजी मुख्यमंत्री गेले ते पण व्हॅनिटी व्हॅनने. वरती गडाजवळ गेलेच नाहीच खालतीच आपली लुडबुड केली काय दुर्देव आहे आणि आणि ज्यांना ठाकरे गट खोके खोके म्हणत हिणवत असतात ते मुख्यमंत्री भर पावसात दोन तासांची पायपीट करून दुर्घटनास्थळी लोकांचे अश्रू आपले मानून गेले. बघा किती फरक आहे, अशा शब्दांत भाऊंनी आपले मत प्रकट केले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व भारत मातेच्या प्रतिमेला वंदन करून झाली. त्यानंतर भाजप सांस्कृतिक सेलचे सदस्य वैभव बुवा ह्यांच्या प्रास्ताविक पर निवेदानातून त्यांनी कार्यक्रमाचा एकूण उद्देश लोकांसमोर मांडला. त्यानंतर अभिषेक पटवर्धन यांनी भाऊ तोरसेकर हयांची एका वेगळ्या शैलीत ओळख करून देत त्यांच्या सोशल मीडिया वरील फॉलोवर्सचा आणि इतर आकडेवारींचा वेध घेतला.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, दीपक बेहेरे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारूशिला घरत, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, रूचिता लोंढे, दर्शना भोईर, राजश्री वावेकर, रवींद्र जोशी, सुमित झुंजारराव, अमरिष मोकल, गणेश जगताप, चिन्मय समेळ, अमोल खेर, निखिल गोरे, अक्षया चितळे, अंजली इनामदार, विद्या तामखेडे, बबन बरगजे, आदित्य उपाध्ये तसेच भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मान्यवरांच्या उपस्थितीत अन्यही कार्यक्रम

*या कार्यक्रमामध्ये भाऊ तोरसेकर ह्यांचा सन्मान सत्कार करण्यात आला. या वेळी भाजप सांस्कृतिक सेलच्या सदस्य ऋतुपर्णा किरटोणीया हिने भाऊंचे हुबेहूब काढलेले स्केच हे त्यांना भेट म्हणून देण्यात आले. भाजप उत्तर रायगडचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचा विशेष सत्कार भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आला.*

# उरणमध्ये पिसाळलेल्या कुत्र्यांची दहशत

## १३ जणांना चावा; बांधपाडा-खोपटे ग्रामस्थ भयभीत

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली असून खोपटा गावातील १३ नागरिकांना चावा घेतल्याची घटना रविवारी (दि. ३०) घडली आहे. या सहा जखमी नागरिक इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण येथे उपचार घेत आहेत. तर सात नागरिक उपचार घेऊन घरी गेले आहेत. तरी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी खोपटा गावातील रहिवाशांनी केली आहे. उरण तालुक्यातील अनेक गावात भटक्या कुत्र्यांची संख्या बळावली आहे.

ही भटकी कुत्री नागरिकांना चावा घेत आहेत. त्यामुळे गावा गावातील नागरिक भटक्या कुत्र्यांच्या दहशतीत वावरताना दिसत आहेत. त्यातच रानसई आदिवासी गावातील रहिवाशांना कुत्र्यांनी चावा घेतल्याने एकचा दुदैवी मुत्यू झाल्याची घटना घडली होती. तसेच जेएनपीए वसाहतीत डॉक्टर व रहिवाशांना कुत्रा चावल्याची घटना घडली होती. तसेच नूकताच आवरे गावा जवळील जंगलात मुक्त संचार करणाऱ्या भेकर जातीच्या वन्यप्राण्यावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना घडली होती.



सध्या उरण तालुक्यात भटक्या कुत्र्यांचा उच्छाद वाढत असल्याने अशा कुत्र्यांचा बंदोबस्त लावण्यासाठी संबंधित प्रशासनाने पुढाकार घेतला नाही. अशा भटक्या कुत्र्यांनी खोपटा गावातील १३ नागरिकांना चावा घेतल्याची घटना रविवारी घडली आहे. यातील सहा जखमी उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत आहेत. तर सात रुग्ण उपचार घेऊन घरी गेल्याची माहिती डॉक्टरांकडून देण्यात येत आहे. अशा भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त लावण्याची मागणी भयभीत झालेले बांधपाडा-खोपटे गावातील रहिवासी व्यक्त करत आहेत.

> **खोपटा गावातील कुत्र्यांचा उच्छांक वाढला आहे. या कुत्र्यांनी १३ जणांना चावा घेतला आहे. बांधपाडा-खोपटे गावातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी बांधपाडा ग्रामपंचायतीकडून करण्यात आली आहे.**
>
> **-विशाखा ठाकूर, सरपंच, बांधपाडा ग्रामपंचायत**



**पनवेल : भाजप उत्तर भारतीय मोर्चाच्या उलवे नोड उपाध्यक्षपदी ॲड. सुनील मौर्या यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. या वेळी त्यांनी मौर्या यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. भाजप उत्तर भारतीय उलवे नोडचे अध्यक्ष अवधेश कुमार महतो, युवा नेता मनोज मौर्या, संकल्प घक्षरत, जवाहन चौहान, अखिलेश विश्वकर्मा आदी या वेळी उपस्थित होते.**

## लोखंडी बॅरिगेट्स चोरणारा गजाआड; साथीदार फरार

**पनवेल :** तालुक्यातील मुंबई-पुणे एक्स्प्रेस रस्त्यालगत बिंदास बारच्या पुढे नवीन मेरिको इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे ९३ लोखंडी बॅरीगेट्स (किंमत जवळपास दोन लाख ३२ हजार ५०० रुपये) चोरल्याप्रकरणी एका व्यक्तीला पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले, तर त्याचा साथीदार फरार असल्याने त्याचा शोध सुरू आहे. नवीन मेरिको इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवे रोड वर दुरुस्तीचे कळंबोली सर्कल ते खालापूर टोलनाका पर्यंत कामाच्या ठिकाणाहून दोन लाख ३२ हजार ५०० रुपये किमतीचे एकूण ९३ लोखंडी बॅरीगेट्स चोरी झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानुसार पोलिसांच्या आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे टेम्पोचालक भारत वानखडे (वय ३३) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून १,३२,५०० किमतीचे ५३ लोखंडी बॅरीगेट्स जप्त करण्यात आले आहे.

## वावंजेतून अवैध गुटखा साठा हस्तगत

### तीन जणांविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांनी वावंजे गावात छापा टाकून गुटखा विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाई करत हजारो रुपये किमतीचा गुटख्याचा साठा हस्तगत केला आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अमलीपदार्थ विक्री करणाऱ्यांविरोधात कडक कारवाईचे आदेश सर्व पोलीस स्थानकांना दिले आहेत. त्यानुसार पोलिसांच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून वावंजे गावात बेकायदेशीरपणे गुटख्याची विक्री होत असल्याची माहिती मिळाली.

यानुसार या पथकाने वावंजे गावातील जुने फर्निचर मार्केट येथे छापा टाकून आरोपी अब्दुल हमीद जानमोहम्मद शेख (वय ३२, रा. वावंजे), महेंद्र महातो (वय ३५, रा. वावंजे) आणि जितेंद्रकुमार कामत (वय २०, रा. पेंधर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १६ हजार २४७ रुपये किमतीचा गुटखा जप्त केला आहे.

## भाजप अल्पसंख्याक सेलची गुरुवारी कार्यकर्ता संवाद बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप अल्पसंख्यक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुलतानी यांचा राज्यभर दौरा चालू झाल्याने कोकण विभागीय कार्यकर्ता संवाद बैठक पनवेल येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ ह्या सभागृहात गुरुवारी (दि. ३) सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

कोकण विभागीय संवाद बैठकीत अल्पसंख्यक मोर्चाचे सर्व मंडळाचे कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष जसीम गॅस यांनी केले.

या बैठकीत प्रदेश अल्पसंख्यक मोर्चा प्रदेश सरचिटणीस अतिक खान, जुनैद खान, मुंबई अध्यक्ष वसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष सलीम जहांगीर, सय्यद अकबर, इफतेकार अत्तार, सचिव मेराज खान, मन्सूर पटेल, माजी नगरसेवक मुकीद काझी, दक्षिण जिल्हाध्यक्ष रईस कादरी, जिल्हा सरचिटणीस गौसखान पठाण, साबीर शेख, इर्शाद शेख, अमन अखतर आदी उपस्थित राहणार असून अपेक्षित श्रेणी कोकण विभागीय अल्पसंख्यक मोर्चा प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष/शहराध्यक्ष, जिल्हा, शहर व मंडळ कार्यकारणी बैठकीला उपस्थित राहणार आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि. ३१) व्यवस्थापन संघटनेतर्फे व्यवस्थापन गुरु या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती.

या वक्तृत्व स्पर्धेसाठी महाविद्यालयातील व्यवस्थापन शिक्षण विभागातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी व्यवस्थापन गुरु हा विषय देण्यात आला होता त्यामध्ये प्रामुख्याने शिवाजी महाराज, चाणक्य, हेनरी फेऑल, रतन टाटा या महान व्यवस्थापन गुरु विषयी सुमारे १५ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपले विचार मांडले तसेच प्रेषक म्हणून सुमारे ५० विद्यार्थ्यांनी या वक्तृत्व स्पर्धेचा लाभ घेतला. या वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. तनुजा सुमन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या वक्तृत्व स्पर्धेचा प्रमुख उद्देश विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये व्यासपीठ धाडस तसेच, व्यवसाय व्यवस्थापन, संप्रेषण कौशल्ये, सादरीकरण कौशल्ये यांचा विकास करणे हे होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रुपेंद्र गायकवाड यांनी सर्व सहभागी झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना या वक्तृत्व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व मोलाचे मार्गदर्शन केले. या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन प्रा. रीत ठुले (समन्वयक, व्यवस्थापन संघटना) यांनी केले तसेच प्रा. अंकिता जांगिड, प्रा. रेवन शिंदे, प्रा. विशाल देशमुख, प्रा. डॉ. धनवी आवटे, प्रा. डॉ. वर्षा माने प्रा. दिव्या नाम्बुत्री व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## भाजप कामगार सेलतर्फे 'मन की बात'चे प्रक्षेपण

**पनवेल : वार्ताहर**

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. भाजप कामगार मोर्चाच्या माध्यमातून सदर कार्यक्रम सामान्य जनतेच्या पर्यंत पोहचवण्यासाठी नवी मुंबई, पालघर, कोकण विभागात कामगारांसाठी 'मन की बात' कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले. या वेळी मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.



नवे विचार आणि नवी ऊर्जा देणारे देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. हा कार्यक्रम सामान्य जनतेच्या पर्यंत पोहचवण्याचे कार्य भाजप कामगार मोर्चा च्या माध्यमातून भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कामगार मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे यांचा सूचनेनुसार केले गेले होते. त्यानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात हा कार्यक्रम कामगार मोर्चा च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या ताकदीने राबवला.

नवी मुंबई, पालघर व दापोली या ठिकाणी प्रदेश उपाध्यक्ष संजय वासुदेव पवार आणि कोकण अध्यक्ष कमलेश राणे, पालघर जिल्हा अध्यक्ष अशोक आंबूरे, कोकण सचिव स्वरूप महाजन, समाजसेवक अशोक नरबागे यांच्या कडून कामगारांसाठी 'मन की बात' कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले. या वेळी मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.

## इनरव्हील क्लबचा झोनल मीट उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ न्यू पनवेल हे सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबवत असतात. या क्लबचे वैशिष्ट्य म्हणजे हा क्लब ३१ वर्षा पासून सतत समाजसेवा करत आहे. या अंतर्गत नवीन पनवेल येथील साईनंदन हॉल येथे इनरव्हील क्लब ऑफ न्यू पनवेल यांच्या वतीने सोनिया झोनल मीट आयोजित करण्यात आले होते.

या मीटमध्ये १३ क्लब सहभागी झाले होते. एकूण १७० महिला या वेळी उपस्थित होत्या. त्यांनी क्लबची माहिती देऊन अधिक मासच्या निमित्ताने कृष्ण ही थीम ठेऊन नृत्य स्पर्धेचे आयोजन केल होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून अर्चना परेश ठाकूर यांनी उपस्थिती लावली. त्यांनी सर्व स्पर्धकांच्या कलेला वाव देत सर्वांचे कौतुक केले तसेच त्यांना प्रोत्साहन दिले.

हा कार्यक्रम प्रेसिडेंट शिल्पा राजपूत, सेक्रेटरी संपदा बापट, ट्रेजरर मोना जेठवा, एडिटर सोनम पटेल, आयएसओ रश्मी वारीया यांनी मिळून आयोजित केला होता. या वेळी पीडीसी संतोष सिंग गव्हर्नर, पीडीसी नीलिमा आगोसे, झोनल कॉर्डिनेटर डॉक्टर प्रतिमा, डिस्ट्रिक्ट चेअरमन रचना मालपाणी, प्रेसिडेंट प्रीती गुनाणे, आयएडब्ल्यू प्रेसिडेंट क्रिश ढोकलास आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# दृष्टिदोषावर उपचार

भारताकडे बघण्याचा दृष्टिकोन आता प्रचंड आशावादी होत असल्याचे जागतिक चित्र आहे. याचे संपूर्ण श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धडाडीच्या नेतृत्वाला आणि डोळस निर्णयशक्तीला द्यायला हवे. अर्थात विरोधकांना हे पटणार नाही. देशात जे वाईट घडते त्याचीच चर्चा सुरू ठेवणे त्यांना सोयीचे आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी रविवारी ठाण्यामध्ये एका कार्यक्रमात भारताबाबत नकारात्मक दृष्टिकोन ठेवणाऱ्यांवर थोडे शाब्दिक उपचार केले.

**सौंदर्य हे बघणाऱ्याच्या दृष्टीतच असावे लागते, अशा आशयाचे एक वचन इंग्रजी भाषेत आहे. दिसतो तो चेहरा सुंदर असतोच असे नाही, पण बघणाऱ्याला त्यातील सौंदर्य दिसून येते, फक्त ती सौंदर्यदृष्टी त्याच्याठायी हवी. दुर्दैवाने काही लोकांना चांगले घडलेले दिसतच नाही. जिथे-तिथे त्यांना फक्त नको तेच दिसते. असा नकारात्मक दृष्टिकोन व्यक्तीच्या किंवा समाजाच्या प्रगतीला बाधक ठरतो. अनेक शतकांपासून आपल्या देशाकडे बघण्याचा पाश्चात्य राष्ट्रांचा दृष्टिकोन असाच रोगट राहिला होता. भारत देश म्हटले की अडाणीपणा, अंधश्रद्धा, रोगराई आणि अस्वच्छता यांचेच चित्र त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहात असे. कालांतराने साधू, बैरागी, गारुड्याचे खेळ आणि जादू यांची त्यात भर पडली, परंतु तेव्हाही आपला देश जगातल्या मागास आणि कायम दबावात असलेल्या राष्ट्रांपैकी एक म्हणून ओळखला जात असे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असताना भारताबाबतची ती आंतरराष्ट्रीय प्रतिमा आता भराभरा बदलू लागली आहे. अशावेळी सदोदित नकारघंटा वाजवणाऱ्या विरोधकांना कडू औषध पाजताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केलेले विचार मनोज्ञ आहेत. ठाणे येथील बाळकुम भागात महापालिकेच्या ग्लोबल इमारतीच्या परिसरात धर्मवीर आनंद दिघे कर्करोग रुग्णालय उभे राहात आहे. त्यासोबत भव्य त्रिमंदिर संकुल अल्पावधीतच उभे राहणार आहे. या दोन्ही उपक्रमांचे भूमीपूजन सरसंघचालकांच्या हस्ते झाले. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सक्रीय पाठबळ आहे. ठाणे जिल्ह्याच्या परिसरात सामान्यजनांना परवडणारे कर्करोग रुग्णालय उभे राहणे नितांत आवश्यक होते. या कार्यक्रमाला गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आवर्जून उपस्थित राहिले होते. यावरूनच या उपक्रमाची महती कळायला हवी. या वेळी बोलताना सरसंघचालक भागवत म्हणाले की देशात जे वाईट घडते त्याचीच चर्चा अधिक होते, परंतु पूर्वीपेक्षा ४० पट वेगाने चांगली कामे देशात सुरू आहेत हे कोणी लक्षात घेत नाही. अनेक जण नि:स्वार्थ भावनेतून चांगले काम करीत आहेत. लाभाची अपेक्षा नसेल तरच चांगले काम होते. कार्य हे संवेदनेतूनच व्हायला हवे असे सरसंघचालक म्हणाले. मुख्यमंत्री शिंदे यांनी कर्करोग रुग्णालयाचा प्रकल्प हाती घेतानाच आपले गुरू धर्मवीर आनंद दिघे यांचे ऋणदेखील काही अंशी फेडले. कारण हा प्रकल्प दिघे यांच्या नावानेच सुरू होत आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी जैन समाजाने सढळ हस्ते मदत केली आहे. जैन समाजाच्या श्रमातून आणि मेहनतीतूनच हे प्रकल्प साकार होत आहेत. केवळ पैसा कमवायचा नाही तर तो सेवेसाठी खर्च करायचा असतो हे तत्त्व जैन समाजात पाळले जाते अशा शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी कृतज्ञता व्यक्त केली. चांगल्या घडणाऱ्या कामाची नोंद इतिहासाला घ्यावीच लागते याचे उदाहरण म्हणून या प्रकल्पांकडे पाहायला हवे.**

# भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक



'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच', हे वाक्य आजचे नाही, पण ते वाचून, ऐकल्यावर बाळ गंगाधर टिळक आठवतात, हे वाक्य प्रत्येक वेळी बोलताना किंवा ऐकताना जोश, उत्साह आणि उमेद जाणवते. बाळ गंगाधर टिळक हे लोकमान्य टिळक म्हणूनही ओळखले जातात. लोकमान्य ही पदवीही त्यांना देण्यात आली. लोकमान्य म्हणजे लोकांनी स्वीकारलेला नेता. लोकमान्यांशिवाय त्यांना हिंदू राष्ट्रवादाचे जनकदेखील म्हटले जाते.

बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी झाला आणि १ ऑगस्ट १९२० रोजी त्यांचे निधन झाले. ते एक भारतीय राष्ट्रवादी, शिक्षक, समाजसुधारक, वकील आणि स्वातंत्र्यसैनिक होते. ते भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील पहिले लोकप्रिय नेते बनले. ते हिंदू म्हणून ओळखले जात होते. त्यांना राष्ट्रवादाचे जनक देखील म्हटले जाते. बाळ गंगाधर टिळक हे ब्रिटीश राजवटीत स्वराज्याचे पहिले आणि खंबीर पुरस्कर्ते मानले जातात. त्या काळात त्यांनी मराठी भाषेत नारा दिला, त्यांचा मराठी भाषेत दिलेला नारा आहे. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच खूप प्रसिद्ध झाला. त्यांनी बिपिन चंद्र पाल, लाला लजपत राय, अरविंद घोष, व्ही. ओ. चिदंबरम पिल्लई आणि मुहम्मद अली जिना यांच्यासह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनेक नेत्यांशी घनिष्ठ युती केली.

बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली गावात झाला. रत्नागिरी गावातून आधुनिक महाविद्यालयात शिक्षण घेतलेले ते भारतीय पिढीतील पहिले सुशिक्षित नेते होते. त्यांनी काही काळ शाळा-महाविद्यालयांमध्ये गणित शिकवले. ते इंग्रजी शिक्षणाचे टीकाकार होते. यामुळे ते भारतीय सभ्यतेचा अनादर शिकवते, असा त्यांचा समज होता. भारतातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दिशेनेही बरेच काम झाले आहे.

बाळ गंगाधर टिळकांनी इंग्रजीत मराठा दर्पण आणि मराठीत केसरी नावाची दोन दैनिके सुरू केली, ही दोन्ही दैनिके लवकरच लोकांमध्ये लोकप्रिय झाली. टिळकांनी ब्रिटीश राजवटीच्या क्रौर्याबद्दल आणि भारतीय संस्कृतीच्या न्यूनगंडावर टीका केली होती. ब्रिटीश सरकारने ताबडतोब भारतीयांना पूर्ण स्वराज्य द्यावे, अशी त्यांची मागणी होती. केसरी या वृत्तपत्रात ते इंग्रजांविरुद्ध अतिशय आक्रमक लेख लिहीत असत. या लेखांमुळे त्यांना अनेकवेळा तुरुंगात पाठवण्यात आले.

बाळ गंगाधर टिळक त्यांच्या काळातील सर्वात प्रमुख कट्टरपंथी होते. याशिवाय लवकर लग्नालाही त्यांचा विरोध होता. म्हणूनच ते १८९१ च्या संमती वयाच्या विधेयकाच्या अगदी सुरुवातीपासूनच विरोधात होते, कारण ते हिंदू धर्मावरील अतिक्रमण आणि एक धोकादायक उदाहरण म्हणून पाहत होते. या कायद्याने मुलीचे लग्न करण्याचे किमान वय १० वरून १२ वर्षे केले.

बाळ गंगाधर टिळकांनी एकदा त्यांच्या 'केसरी' या पत्रात 'देशाचे दुर्दैव' असा लेख लिहिला होता, त्यात ब्रिटिश सरकारच्या धोरणांना विरोध करण्यात आला होता. यामुळे, त्यांना ७ जुलै १८९७ रोजी देशद्रोहासाठी अटक करण्यात आली. त्यांना मंडाले (ब्रह्मदेश) तुरुंगात सहा वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली. ब्रिटिश सरकारने त्यांना सहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. तुरुंगवासाच्या काळात टिळकांनी तुरुंग व्यवस्थापनाला आणखी काही पुस्तके लिहिण्यास सांगितले, परंतु ब्रिटिश सरकारने त्यांना राजकीय क्रियाकलाप असलेले असे कोणतेही पत्र लिहिण्यापासून रोखले. टिळकांनी तुरुंगात एक पुस्तकही लिहिले, बाळ गंगाधर टिळकांच्या पत्नीचे त्यांची शिक्षा पूर्ण होण्यापूर्वीच निधन झाले.

नवीन सुधारणांना निर्णायक दिशा देण्याआधीच १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबईत त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल आदरांजली वाहताना महात्मा गांधींनी त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हटले, जवाहरलाल नेहरूंनी त्यांना भारतीय क्रांतीचे जनक म्हटले.

**(साभार : मराठी वेबदुनिया)**

# प्रतिभावंत साहित्यिक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे प्रतिभावंत लेखक होते. वंचितांच्या हक्कासाठी लढणारे लोकनायक आणि क्रांतिकारी वादळ अशी त्यांची ख्याती आहे. आज १ ऑगस्ट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिन व 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' असेब्रिटिशांना ठणकावून सांगणारे लोकमान्यबाळ गंगाधर टिळक यांचा स्मृतिदिन आहे.

१९२० मध्ये सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव मधील एका गावकुसाबाहेरी मांग वाड्यात अण्णाभाऊंचा जन्म भाऊराव व वाललुबाई या माता पित्याच्या पोटी झाला. केवळ दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या, १३ लोकनाट्य, १३ कथा, १५ पोवाडे, ६ नाटके, ७ चित्रपट इत्यादी साहित्य कृती लिहून मराठी सारस्वताला समृद्ध केले. त्यांनी हस्तिदंती मनोऱ्यात राहून कल्पना विश्वात रमणारे साहित्य लिहिले नाही तर मानवमुक्ती, विवेकवाद, समताधिष्टीत समाज, स्त्रीचे शील, देशाचे स्वातंत्र्य, पुरूषाचा स्वाभिमान, वंचित, शेषित, कष्टकरी यांच्या रक्त अश्रूंची महती गाणारे आणि त्यांचा आत्मसन्मान वाढविणारे साहित्य यासाठी आपली लेखणी आणि वाणी झिजवली. अण्णाभाऊंनी जे पाहिल अनुभवल ते लिहिल. अण्णाभाऊंच्या साहित्यातील पात्र हि रडणारी नव्हती तर लढणारी व स्वाभिमानी होती.

अण्णाभाऊनीही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून अपेक्षितांच्या तळहातावर तरली आहे,हा विज्ञानवादी सिद्धांत मांडून हजारो वर्षाच्या परंपरेला छेद दिला. बहुजन समाजाला अंधश्रद्धेतून व कर्मकांडामधून मुक्त होण्याचा संदेश त्यांनी दिला. साहित्य हे समाज परिवर्तनाचे शस्त्र असते हे अण्णाभाऊंनी आपल्या लिखाणाद्वारे सिद्ध केले. रशियामध्ये जाऊन त्यांनी छत्रपती शिवरायांचा पोवाडा गायला आणि छत्रपती शिवरायांचे नाव साता समुद्रापार पोहचविले. त्यांनी तमाशाला लोकनाट्याचे स्वरूप देऊन ते समाज प्रबोधनाचे माध्यम बनविले.

लोकनाट्याची सुरुवात प्रथम मायभूच्या चरणा।छत्रपती शिवबा चरणा। अशी करून शिवरायांच्या प्रति आदर व्यक्त केला. अण्णाभाऊनी माझी मैना गावाकडे राहिली। माझ्या जीवाची होतीया काहिली। ही छक्कड लिहून संयुक्त महाराष्ट्राच्या चवळीचा अग्निकुंड धगधगता ठेवत जनजागृती केली. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले, परंतु हे स्वातंत्र्य अभिजन, भांडवल वर्गापुरते आहे, अजून वंचित, शोषित असलेला बहुजन वर्ग या स्वातंत्र्यापासून पोरका राहिलेला आहे. म्हणून त्यांनी एक २० हजार लोकांचा मोर्चा मंत्रालयावर काढला. आणि ये देश की आजादी झुटी है। देश की जनता भुकी है। असा नारा दिला.

तापल्या उन्हात दाट वृक्षाची जशी गार सावली। तशी अण्णाभाऊ तुम्ही गरीब, कष्टकऱ्यांचीमाऊली। असा प्रतिभावंतसाहित्यिक, लोककवी, लेखक, समाजसुधारक,साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊंचे १८ जुलै १९६९ रोजी मुंबईमधील चिरागनगरच्या झोपडपट्टीमध्ये निधन झाले. अण्णा भाऊंची व्यापक विचारधारा स्वीकारून समाजोपयोगी कामे केली पाहिजेत.त्यांचे विचार मराठी माणसात रुजवून त्यांच्या विचारांचा जागर केला पाहिजे.हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अशा या लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंना त्यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य टिळकांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन!....

**-डॉ. संतोष बाबरे**




## 'या' ओटीटी प्लॅटफॉर्मवरही पासवर्ड शेअरिंग मर्यादा?




नेटफ्लिक्स नंतर आता आणखी एका ओटीटी स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मने युजर्सना धक्का देण्याचा निर्णय घेतला आहे. रिपोर्ट्सनुसार, डिस्ने+ हॉटस्टार लवकरच त्याच्या प्रीमियम वापरकर्त्यांमध्ये पासवर्ड शेअर करण्याच्या मर्यादेबाबत नवीन निर्णय घेऊ शकते. नवीन अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, कंपनी नवीन पॉलिसी लागू करण्यावर काम करत आहे, ज्यानंतर प्रीमियम वापरकर्ते एका खात्यातून फक्त ४ डिव्हाइसवर लॉग इन करू शकतील. डिस्ने+ हॉटस्टारचा हा निर्णय पासवर्ड शेअरिंगची समस्या सोडवण्यासाठी घेण्यात येत आहे.

रॉयटर्सच्या मते, डिस्ने+ ही आता नेटफ्लिक्सच्या मार्गावर आहे. यापूर्वी मे महिन्यात डिस्नेच्या प्रतिस्पर्धी स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सने १०० हून अधिक देशांमध्ये पासवर्ड शेअरिंगसाठी समान धोरण लागू केले होते. नेटफ्लिक्सने ग्राहकांना सांगितले की आता युजर्सना त्यांच्या घराबाहेर पासवर्ड शेअर करण्यासाठी अतिरिक्त पैसे द्यावे लागणार आहेत. सध्या भारतात प्रीमियम डिस्ने+ हॉटस्टार खाते १० उपकरणांपर्यंत लॉग इन केले जाऊ शकते. मात्र, आता वेबसाइटने चार उपकरणांची मर्यादा निश्चित केली आहे. कंपनीने या धोरणाची अंतर्गत चाचणी केली आहे आणि येत्या काही आठवड्यांत ते सर्व वापरकर्त्यांसाठी लागू केले जाऊ शकते. नवीन पॉलिसीसह चार उपकरणांपर्यंत प्रीमियम खाती मर्यादित ठेवण्याचा कंपनीचा मानस आहे.

डिस्ने, नेटफ्लिक्स, अमेझॉन आणि जिओ सिनेमा यांनी भारतात प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. मीडिया पार्टनर्स एशियाच्या मते, भारताचे स्ट्रीमिंग मार्केट २०२७ पर्यंत ७ अब्ज उद्योग बनण्याची अपेक्षा आहे. डेटा दर्शवितो की हॉटस्टार सध्या जास्तीत जास्त वापरकर्त्यांच्या बाबतीत आघाडीवर आहे आणि सध्या जवळपास ५० दशलक्ष सदस्य आहेत. रिसर्च फर्म मीडिया पार्टनर्स एशियाने उघड केले आहे की जानेवारी २०२२ ते मार्च २०२३ दरम्यान डिस्ने हॉटस्टार भारताच्या स्ट्रीमिंग मार्केटमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. याने एकूण ३८ टक्के प्रेक्षकसंख्या मिळवली.

# कथाकार, कादंबरीकार श्री. ज. जोशी



## निमित्त

श्रीकृष्ण जनार्दन जोशी यांचा जन्म पुणे येथे १ ऑगस्ट १९१५ रोजी झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण नूतन मराठी विद्यालयात झाले. '१९३८ साली मराठी विषय घेऊन तिसऱ्या वर्गात बी.ए. झालो' असा उल्लेख आपल्या 'पुणेरी' या पुस्तकात करून ते म्हणतात की, घराण्यातील पहिला पदवीधर मीच! नोकऱ्यांचा दुष्काळच होता. त्यांनी फुटकळ नोकऱ्या केल्या.

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यामुळे पुण्याच्या आसपास निघालेल्या लष्करी डेपोकडे बेकारांची रीघ लागली. वानवडीच्या मिलिटरी अकाउन्ट्स ऑफिसमध्ये कारकून हुद्द्यावर जोशींना नोकरी लागली व ३२ वर्षांनी ते तिथूनच निवृत्त झाले. नोकरी लागण्यापूर्वी त्यांच्या अनेक कथा किर्लोस्कर मासिकात प्रसिद्ध झाल्या होत्या.

श्री.म.वि.गोखले यांच्या सहकार्याने तीन भागांत प्रकाशित केलेल्या 'ऐलमा पैलमा'च्या भूमिकेत जोशी लिहितात की, 'आंतरराष्ट्रीय महिलावर्षाच्या निमित्तानं मराठी स्त्रीच्या जीवनावर प्रकाश पाडणारं पुस्तक लिहिण्याची कल्पना सुचली.' १८६० ते १९६० या शंभर वर्षांच्या काळात सहा पिढ्या होऊन गेल्या असे गृहीत धरून मराठी स्त्रीच्या जीवनात कसे-कसे बदल होत गेले, याचा त्यांनी धांडोळा घेतला आहे. एकाच मध्यमवर्गीय कुटुंबाभोवती हा शंभर वर्षांचा इतिहास लेखक द्वयाने गुंफला आहे.

जोशींच्या 'पुणेरी' या पुस्तकातील लेख नुसतेच ललित नसून त्यांमध्ये काही सामाजिक आणि ऐतिहासिक आशय आहे, असा उत्कट प्रत्यय वाचकाला येतो. 'काळ' या दैनिकात जोशी यांनी 'किसन' या टोपणनावाने ब्रिटीश सरकार, स्वातंत्र्योत्तर काँग्रेस सरकार, गांधीजी, जीना, चर्चिल वगैरेंवर टीकास्त्र चालवले होते. 'चर्चिल मेडिकल कॉलेज' हा लेख खूपच गाजला. त्या लेखाबद्दल सरकारने 'काळ'कडून दोन हजार रुपयांचा जमीनही घेतला होता. लेखप्रकाशनाच्या बाबतीत 'काळ'कर्ते मामा दाते यांनी टिळकांचा बाणा दाखवला. 'किसन' म्हणजे कोण, याचा पत्ता लागू दिला नाही. दाते तुरुंगात गेले. जोशींचा कारावास वाचला व नोकरीही शाबूत राहिली. श्री.पु.भागवत त्यांना म्हणाले, तुमचे लेख फार चांगले असतात. मोरारजी देसाईंनी दाते यांना सांगितले, युवर किसन हॅज अ पॉयझनस पेन!

'मी पुण्याहून लिहितो की....' ही जोशी यांची लेखमाला, महाराष्ट्र टाइम्समध्ये वर्षभर येत होती. जोशींच्या 'आनंदीगोपाळ' कादंबरीने चरित्रात्मक कादंबरीचा प्रवाह मराठीत आणला. गोपाळरावांच्या हटवादी स्वभावामुळे डॉक्टर होण्यासाठी परदेशी गेलेल्या कोवळ्या वयाच्या आनंदीबाईंची झालेली फरफट जोशींनी प्रवाही भाषेत चित्रित केली आहे. ही कादंबरी खूप लोकप्रिय झाली. त्या कादंबरीवर जोशींनी पुढे नाटकही लिहिले. काशीनाथ घाणेकरांच्या भूमिकेमुळे ते रंगभूमीवर चांगलेच गाजले. जोशींनी लिहिलेली 'रघुनाथाची बखर' (श्री.र.धों.कर्वे यांच्यावर लिहिलेली) ही कादंबरी चर्चेचा व टीकेचा विषय झाली.

श्री.ज.जोशींचे एकूण ३५ कथासंग्रह प्रकाशित झाले. 'पांढरपेशांचे जग' (१९४४), 'सुलभा' (१९५६), 'मामाचा वाडा' (१९६२), 'ओलेता दिवस' (१९६५), 'अनुभव' (१९७५) हे त्यांतील काही, वर उल्लेख केलेल्या दोन कादंबर्यांव्यतिरिक्त 'धूमकेतू' (१९७६), 'काचपात्र' (१९८५) अशा इतरही कादंबर्या प्रकाशित झाल्या. मनोहर माळगावकर व आर.के.नारायण यांच्या कादंबर्यांचे अनुवाद श्री.जं.नी केले. ललित लेखनात 'पुणेरी' (१९७८), 'सूर्यापोटी' (१९७१), 'सुचलं तसं लिहिलं', 'जोशी पुराण' इत्यादींचा समावेश होतो.

**-वि. ग. जोशी**

## क्लिक...क्लिक...!



**पेण : पावसाळ्यात कसमाळ येथील धबधब्यावर पर्यटक वर्षासहलीचा मनसोक्त आनंद घेत असतात.**

## आरोग्य प्रहर

### कारलं खाऊन वजन 'असे' करा कमी!



वजन कमी करण्याचा विचार करताना आधी मिठाई सोडण्याचा सल्ला दिला जातो, पण तुम्हाला माहित आहे का की कडू पदार्थ खाल्ल्याने पोट आणि कमरेची चरबी कमी होते. आम्ही कारल्याबद्दल बोलत आहोत. कारलं ही एक अशी भाजी आहे जी अनेकांना आवडत नाही. नाव ऐकताच लोक नाक मुरडतात, पण आरोग्याच्या दृष्टीने हे खूप फायदेशीर आहे. जर तुम्हाला त्याच्या औषधी गुणधर्मांबद्दल माहिती असेल तर तुम्ही नियमित आहारात याचा समावेश नक्कीच कराल.

कारल्यात कॅलरीजचे प्रमाण खूप कमी असते, तसेच व्हिटॅमिन सी, फायबर, झिंक आणि फोलेट भरपूर प्रमाणात असते. याच्या मदतीने वजन तर कमी करता येतेच, पण आपल्या शरीराची प्रतिकारशक्तीदेखील वाढते. चला तर मग जाणून घेऊया कारल्याच्या मदतीने तुम्ही कसे फिट राहू शकता?

कारल्यामध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, ज्यामुळे पचन निरोगी राहते आणि पोटाची समस्या उद्भवत नाही. वजन कमी करण्यासाठी योग्य पचन होणे ही एक महत्वाची अट आहे. हे खाल्ल्याने तुम्हाला जास्त वेळ भूक लागत नाही आणि तुम्ही जास्त अन्न खाणे टाळता.

आपण दिवसभरात किती कॅलरीज घेत आहोत, जेवढे प्रमाण कमी आहे, तितके जास्त वजन कमी होते यावरही वजन कमी होणे अवलंबून असते. याशिवाय यात फॅट आणि कार्बो हायड्रेट्स कमी असतात, ज्यामुळे पोट आणि कमरेची चरबी कमी होण्यास मदत होते.

कारले व्हिटॅमिन सी चा समृद्ध स्त्रोत मानली जाते, ज्याच्या मदतीने शरीरातून विषारी पदार्थ बाहेर पडतात, यामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी बर्न होते, तसेच रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते.

कारले खाण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्याचा रस काढून प्यावा, जर तुम्हाला कडवटपणा कमी करायचा असेल तर थोडा लिंबाचा रस घाला, जर तुम्ही दररोज त्याचे सेवन केले तर वजन कमी होण्यास सुरवात होईल. लक्षात ठेवा जास्त तेलात बनवलेले कारले कधीही खाऊ नका, वजन कमी करणे कठीण होईल.

# आजपासून साजरा होणार महसूल सप्ताह

## लोकाभिमुख उपक्रम राबविणार; जिल्हाधिकाऱ्यांची माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

महसूल दिनाचे औचित्य साधून १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सात दिवस गाव पातळीपासून जिल्हापातळीपर्यंत लोकाभिमुख उपक्रम राबविले जाणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

सप्ताहाच्या पहिल्या दिवशी १ ऑगस्ट रोजी गावपातळीवर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. यात चावडीवर जाऊन शासकीय योजनांची माहिती दिली जाणार आहेत. गाव तिथे स्मशानभूमी उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ज्या २५ गावात स्मशानभूमी उपलब्ध नाहीत तिथे जागा निश्चिती करून प्रस्ताव सादर केले जाणार आहेत. २ ऑगस्टला महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी जिल्ह्यातील युवकांशी संवाद साधणार आहेत. निवडणूक जनजागृती, मतदार नोंदणी, मतदार ओळखपत्रांचे वितरण, विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती, तसेच विद्यार्थ्यांना विवीध दाखल्यांचे वाटप या दिवशी करण्यात येणार आहे.

३ ऑगस्ट हा दिवस आपत्ती व्यवस्थापन जनगागृती दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे. आपत्तीबाधित गावांना भेटी देणे, नुकसानीचे पंचनामे करणे, निकषांनुसार मदत देणे, ग्रामपातळीवर आपत्ती कृती आराखडा तयार करणे, पुनर्वसन करणे गरजेचे असणाऱ्या गावांसाठी जागा निश्चित करणे, दरडग्रस्त गावातील नागरिकांची माहिती संकलित करणे, यांसारखे उपक्रम राबविले जाणार आहेत. ४ ऑगस्टला तालुका पातळीवर कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहेत. नगरपालिकांमध्ये अतिक्रमण हटविणे, दुय्यम आणि उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालयातील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणे, महसूल अदालत घेऊन तससीलदार, उपविभागीय अधिकारी आणि अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

जिल्ह्यातील साडेसहा हजार सैनिक आणि सैनिकांच्या कुटूंबियांच्या प्रश्नांचा निपटारा करण्यासाठी ५ ऑगस्टला विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे, तर ६ ऑगस्ट रोजी महतूल विभागातील निवृत्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला जाणार आहे. सप्ताहाच्या शेवटी वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महसूल कर्मचाऱ्यांचा गौरव केला जाणार आहे. यासाठी ७ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयात यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. जिल्ह्यातील नागरिकांनी महसूल सप्ताहातील उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## महसूल सप्ताहानिमित्त नागरिकांनी सहकार्य करण्याचे प्रशासनाचे आवाहन

**पोलादपूर : प्रतिनिधी**



१ ते ७ ऑगस्टपर्यंत पोलादपूर तालुक्यात महसूल सप्ताहानिमित्त विविध लोकोपयोगी उपक्रमांचे महसूल विभागामार्फत आयोजन करण्यात आले आहे. या वेळी होणाऱ्या विविध उपक्रमांना सहाकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तालुक्यातील जनतेने यानिमित्त सहकार्य करण्याचे आवाहन महसूल सप्ताहाच्या समन्वय अधिकारी तथा माणगावच्या भूसंपादन उपजिल्हाधिकारी डॉ. दीपा भोसले यांनी केले. या वेळी पोलादपूर तहसील कार्यालयामध्ये तहसिलदार कपिल घोरपडे आणि अन्य सहकारी उपस्थित होते.

या वेळी डॉ. दीपा भोसले यांनी पोलादपूर तहसील कार्यालयाची इमारत त्यांच्या तहसिलदारपदाच्या काळामध्ये उभारण्यात आल्याची आठवण आवर्जून व्यक्त करीत संवाद साधला. या वेळी महसूल सप्ताहाच्या कार्यक्रमाचे स्वरूप विषद करताना भूसंपादन उपजिल्हाधिकारी डॉ. दीपा भोसले यांनी १ ऑगस्टला महसूल सप्ताहाचा शुभारंभ तसेच इतर उपक्रम, २ ऑगस्टला युवा संवाद आणि ३ ऑगस्टला नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर एक हात मदतीचा, ४ ऑगस्टला जनसंवाद, ५ ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी, ६ ऑगस्टला महसूली संवर्गातील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद कार्यक्रम तसेच ७ ऑगस्टला महसूल सप्ताह सांगता समारंभानिमित्ताने उत्कृष्ट काम केलेल्या संवर्गनिहाय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये करण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली.

# बीड बौद्धवाडी आणि आदिवासीवाडीचे पुनर्वसन करण्याची ग्रामस्थांची मागणी

**चौक : प्रतिनिधी**



इर्शाळवाडीच्या दुर्घटनेनंतर बीड ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासीवाडी व बौद्धवाडीचे तात्पुरते पुनर्वसन महड गणपती देवस्थान यांच्या भक्तनिवासात करण्यात आले आहे. दरवर्षी पावसाळ्यात असे करावे लागत असल्याने कायमस्वरुपी पुनर्वसन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

इर्शाळवाडीच्या दुर्घटनेनंतर दरडग्रस्त लोकवस्ती असलेल्या आदिवासी व इतर वाड्यांच्यात भीती निर्माण झाली आहे. बीड येथे मागील दोन वर्षांपासून दगड, माती कोसळणे असे प्रकार घडत आहेत. दोन वर्षांपूर्वी २२ जुलै २०२१ रोजी या दोन्ही वस्तीवर चिखल माती घरात शिरून मोठे नुकसान झाले होते. त्या वेळीही त्यांची तात्पुरती निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. गेली दोन वर्षे त्या ठिकाणी बांबूची लागवड करण्यात येत आहे, जेणेकरून बांबूच्या मुळांमुळे माती घट्ट बसते.

मुळात सैल झालेली माती, जमिनीत होणारे हादरे, तुफान पडणारा पाऊस, उतार असलेली जमीन यामुळे तेथे वस्ती करून राहणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे आहे. त्यामुळे आमचे कायमस्वरुपी पुनर्वसन अशा ठिकाणी करावे जिथे आमच्या मुलांच्या शिक्षणासाठी सोय होईल, आम्हाला रोजगार निर्मितीचे साधन होईल, दळणवळण यंत्रणा तयार असेल, निवारा, आरोग्य, पाणी याची खात्री असणाऱ्या ठिकाणी सोय व्हावी, अशी मागणी येथील दरडग्रस्त जनतेची आहे.

# खोपोली-कर्जत मार्गाची दयनिय अवस्था

## खड्डेमय रस्त्यामुळे अपघाताची शक्यता; दुरूस्तीची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**



खोपोली पळसदरीमार्गे कर्जत रस्त्याची काही ठिकाणी दयनीय अवस्था झाल्याने याचा नाहक त्रास वाहनचालकानसह प्रवाशी वर्गाला करावा लागत आहे. डोलवली व केळवलीदरम्यान रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्ड्यांमुळे लहान-मोठे अपघात होत असून संबंधित खात्याने लवकरात लवकर या रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी होत आहे.

शासनाने लाखो रुपये खर्च करुन खोपोली पळसदरीमार्गे कर्जत रस्त्याची निर्मिती केली. या रस्त्यामुळे खोपोली-कर्जत मुख्य महामार्गाशी जोडले गेले. या मार्गावरील डोलवली व केळवलीदरम्यान पावसामुळे रस्त्याची दयनीय अवस्था झाल्याने मोठमोठे खड्डे पडले आहेत.

वाहनचालकांना आपला जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे हा रस्ता त्वरीत दुरूस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**डोलवली व केळवलीदरम्यान रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे अपघाताला आमंत्रण देत आहेत. संबंधित खात्याचे दुर्लक्ष एखाद्याच्या जीवाशी खेळू शकतो. त्यामुळे येथील रस्त्याची लवकर दुरूस्ती करावी जेणकरून सर्वांचा प्रवास सुखकर होईल.**

**-धनंजय आगीवले, नावंढे**

**रस्त्यावर मोठे खड्डे पडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. अतिवेगामुळे दिवसा, रात्री-अपरात्री अंधारामध्ये अपघात होत असल्याने या रस्त्याची दुरुस्ती लवकर होणे गरजेचे आहे.**

**-समाधान दिसले, केळवली**

## महाड एमआयडीसीतील पिडीलाईट कंपनीविरोधात ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा

**महाड : प्रतिनिधी**



महाड एमआयडीसीमधील पिडीलाईट कंपनीविरोधात देशमुख कांबळे येथील गणेश रघुनाथ मोरे आणि इतर ग्रामस्थ उपोषणाला बसणार आहेत. मुलाला कामावर घेण्याबाबत आणि आजारी पडल्यानंतर कंपनीकडून दुर्लक्ष केल्याचे मोरे यांनी सांगून यामुळेच आपण हे पाऊल उचलल्याचे सांगितले.

महाड औद्योगिक वसाहतीमधील पिडिलाइट कंपनीमध्ये देशमुख कांबळे गावाच्या शिंदेकोंड येथील गणेश रघुनाथ मोरे हे कायमस्वरूपी कामाला होते. २९ मे २०११ रोजी गणेश रघुनाथ मोरे हे कंपनीत काम करीत असताना त्यांना अर्धांगवायूचा झटका आला. त्यामुळे त्यांना मुंबई येथे सायन हॉस्पिटल, केईएम हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू करण्यात आले.

उपचार चालू असताना कंपनीमार्फत कोणीही लक्ष दिले नाही. औषधोपचाराचा खर्चदेखील दिलेला नाही, असे गणेश रघुनाथ मोरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. २०११पासून गणेश रघुनाथ मोरे अंथरुणावरच खिळून असल्याने त्यांनी त्यांचा मुलगा मनीष यास कंपनीमध्ये कामाला घ्यावे अशी मागणी केली, मात्र तरी देखील सन २०१९पासून त्याला अद्याप कामावर घेतलेले नाही. यामुळे येत्या १५ ऑगस्ट रोजी कंपनीच्या प्रवेशद्वारावर गणेश रघुनाथ मोरे यांची संपूर्ण कुटुंब आणि ग्रामस्थ उपोषणाला बसणार आहेत.

याबाबत महाड तहसीलदार शितोळे यांना ग्रामस्थांच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.

## महाडमध्ये अल्पवयीन मुलीवर विनयभंगप्रकरणी गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीच्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन एका तरुणाने तिचा विनभंग करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल झाला असून अद्याप अटक झालेली नाही.

महाड शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. ३१) मिनाक्षी मंगेश रक्ते (वय ३६, रा. कोल चव्हाणवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्याने त्या घरोघर काम करतात. त्यांची १५ वर्षांची अल्पवयीन मुलगी त्यांना या कामात वेळोवेळी मदत करीत असते. शुक्रवारी दुपारी ही अल्पवयीन मुलगी तिच्या घरी काम करीत असताना आरोपी विशाल विष्णू चव्हाण (रा. कोल चव्हाणवाडी) याने घरात घुसून अल्पवयीन मुलीच्या असाय्यतेचा फायदा घेत तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. प्रकरणी आरोपीविरोधात महाड शहर पोलिसांनी भादंवि. कलम ३५४, ३५४ अ, ४५२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियमचे कलम ८नुसार गुन्हा दाखल केला असून पोलीस आरोपीच्या शोधात आहेत. असाच एक छेडछाडीचा प्रकार याच गावातील आरोपी अनिल भाऊ चव्हाण याने केला. त्याने पीडित महिलेचा हात पकडून तिला आपल्या गाडीवर बसण्यास सांगितल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

# श्रीवर्धनमध्ये माकडांमुळे शेतकरी, बागायतदार हैराण

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

तालुक्यामध्ये सध्या बागायतदार व शेतकरी माकडांमुळे हैराण झाले आहेत. बेसुमार होणारी जंगलतोड, नागरिकांचे वनजमिनीत अतिक्रमण व नैसर्गिक आपत्ती यामुळे वानरांना व माकडांना जंगलामध्ये खाद्य मिळत नसल्याने त्यांनी आपला मोर्चा नागरी वस्त्यांकडेदेखील वळविण्याचे पाहायला मिळत आहे.

गावात वानरांचे दहा ते पंधरा जणांचे कळप नारळी पोफळीच्या वाड्यांमध्ये घुसून खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान करतात. केळीची पिकलेली लोंगरे खाऊन टाकतात. शेवग्याच्या झाडावर शेंगा येण्याअगोदर फुले येतात, ही फुलेसुद्धा वानरे खात असतात. भातकापणी झाल्यानंतर शेतकरी शेतामध्ये वालाची पेरणी करतात व वालाचे पीक घेत असतात, परंतु वानरे व माकडे वालाची फुलेदेखील खाऊन या पिकाचे पूर्णपणे नुकसान करतात.

माकडांवर नियंत्रण आणण्यासाठी वनविभागाला विशेष उपाययोजना करण्यासाठी सूचना द्याव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून व बागायतदारांकडून करण्यात येत आहे.


**अलिबाग नगरपरिषद**

**पाणीपुरवठा विभाग**

**ई-निविदा सुचना सन २०२३-२४**

अलिबाग नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडील ई-निविदा सुचनेमध्ये अलिबाग शहराच्या पाणीपुरवठा विभागातील संप हाऊस वरील पंप दुरूस्ती देखभाल करणेबाबत ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सुचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०१/०८/२०२३ रोजी पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल / सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करणेंत येईल.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद**


# आरोग्यवर्धक रानभाज्या बाजारात दाखल

**मुरुड : प्रतिनिधी**



पावसाळा सुरू झाला की रानावनात, माळरानावर, शेतांच्या बांधावर उगवणाऱ्या रानभाज्या म्हणजे आदिवासी मंडळींसाठी जगण्याचा मोठा आधार. जंगलांवर उपजीविका करणाऱ्या आदिवासींना या पावसाळी भाज्यांची चांगली ओळख असते. या भाज्या आता बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होत आहेत.

वर्षभर मेथी, शेपू, पालक, लाल माठ यांसारख्या नेहमीच्या पालेभाज्या खाणारे आपल्यापैकी अनेक जण पावसाळ्यात मात्र रानभाज्यांची चव चाखतात. ठराविक बाजारांमध्ये तेथूनच या भाज्याह ह्या ग्रामीण भागातून विक्रीसाठी येतात. कोकणातील गावागावांत बहुतेकांना या रानभाज्यांची माहिती असल्याने पावसाळी हंगामात त्यांच्या घरात एखादी लज्जतदार रानभाजी असतेच.

निसर्गक्रमानुसार जंगलांमध्ये त्या उगवतात. यापैकी कुठल्या भाज्या खाव्यात हे आदिवासी लोकांना माहित असते. बऱ्याच रानभाज्यांचे गुणधर्म जवळपास सारखेच असतात. प्रत्येक भाजीत लोह, तंतुमय पदार्थ व इतर खनिजे विपुल प्रमाणात आढळतात. त्यामुळे या रानभाज्या आरोग्यासाठी उपयुक्त समजल्या जातात. वर्षातून एकदाच मिळतात या रानभाज्या, तरीही त्या तशा वाजवी दरात मिळतात. आता इंटरनेटवर, समाजमाध्यमांवरही या रानभाज्यांची महती वाचायला मिळते, त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली आहे.

## नाना शंकरशेट यांना अभिवादन

**म्हसळा : प्रतिनिधी**

श्रीगणेश मंदिर येथे दैवज्ञ समाजाची अस्मिता असणारे नाना शंकरशेट यांच्या १५८व्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारी (दि. ३१) त्यांना अभिवादन करण्यात आले.

समाज अध्यक्ष सुनिल उमरोटकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. नंतर श्री गणपतीचे पूजन नगरसेवक उत्कर्ष उर्फ मुन्ना पानसरे यांचे हस्ते करण्यात आले. नाना शंकरशेट यांचे तैलचित्रास पत्रकार संजय खांबेटे यांचेसह उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून गणेश मंदिर ट्रस्टचे एसबीआय बँकेच्या स्कॅनरचे उद्घाटन प्रवीण बनकर, अनिल वेदक, सुनील उमरोटकर यांचे हस्ते करण्यात आले.


**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणीअर्जानुसार नोटीस

सर्व **रामफेर रामदीन शर्मा, कृष्णा अमरदेव शर्मा, विष्णू अमरदेव शर्मा, करण रविंद्र घरत, रेणुका मुकुंद पाटील, सुलोचना मुकुंद पाटील, निर्दोष मुकुंद पाटील, परीतोश किसन गोधळी, सचिन किसन गोधळी, राहणार - मु.पो. जांभुळपाडा, ता. उरण, जि. रायगड......**(अर्जदार)

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजने अंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **नॅशनल युनीयन ऑफ सिफरेर्स ऑफ इंडीया तर्फे श्री मिलींद कांदळगांवकर, सरचिटणीस व खजीनदार, राहणार- नुसी भवन-४, गोवा स्ट्रीट, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४००००१,** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| १८९६ | २७.०७.२०२३ | पुष्पक नोड | २७ | ०७ | २२८० चौ.मी. | ३०.०६.२०२३ | १९.०७.२०२३ |

या नोटीसव्दारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२२३/२०२३-२४

# वाहतुकीचे नियम पाळा!

## पनवेलमध्ये जनजागृती मोहिमेद्वारे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई वाहतूक शाखे अंतर्गत पनवेल शहर वाहतूक शाखेने विशेष जनजागृती मोहीम राबवून मोटर सायकल चालकांना हेल्मेट परिधान करणे, मद्यपाशन करून वाहन न चालवणे, वाहन चालविताना मोबाईलवर न बोलणे, वाहतुकीचे नियम पाळणे पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे गाडीचे कागदपत्र अद्ययावत ठेवणे. मोटार कार चालवताना सीट बेल्ट लावणे याबाबत मार्गदर्शन केले.



वाहने चालवताना सुरक्षेच्या दृष्टिकोनातून वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, परंतु अनेक वाहन चालक याकडे दुर्लक्ष करून नियम धाब्यावर बसवतात. त्याचबरोबर आपला जीवसुद्धा धोक्यात घालतात. या पार्श्वभूमीवर पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ निरीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार पनवेल शहर वाहतूक शाखेच्या वतीने नवीन पनवेल उड्डाणपुलाजवळ विशेष जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या वेळी वाहनचालकांना हेल्मेट परिधान करणे, मद्यपाशन करून वाहन न चालवणे, वाहन चालविताना मोबाईल वर न बोलणे, वाहतुकीचे नियम पाळणे पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे गाडीचे कागदपत्र अद्ययावत ठेवणे, मोटार कार चालवताना सीट बेल्ट लावणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच नागरिकांना वाहतुकीचे नियम न पाळल्याने काय परिणाम होऊ शकतात याबाबत माहिती देण्यात आली. याप्रमाणे नागरिकांचाही खूप चांगल्या प्रकारे सहभाग या प्रबोधनपर कार्यक्रमात दिसून आला आणि बऱ्याच नागरिकांनी हे नियम आपल्यासाठीच आहेत आपल्या भल्यासाठीच आहेत, असे समजून नियम पाळण्यास सुरुवात केली.

या वेळी पोलीस उपनिरीक्षक महाडिक, पोलीस उपनिरीक्षक खांडेकर यांच्यासह पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# नेरूळमध्ये चालत्या गाडीवर झाड कोसळले



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ सेक्टर ४ येथे रविवारी सायंकाळी ७.२० च्या दरम्यान चालत्या गाडीवर झाड पडल्याने दुर्घटना घडली. सुदैवाने या गाडीतील चौघांचे प्राण वाचले असून त्यातील एक जण जखमी झाला आहे.

नवी मुंबईतील सानपाडा येथील रहिवासी असलेले जरांडे कुटुंबीय आपल्या एस क्रॉस या गाडीतून नेरूळकडे जात असताना पामबीच मार्गावरून गाडी सारसोळेच्या दिशेने नेरूळ राजीव गांधी उड्डाणपूल मार्गाकडे जात असताना सेक्टर ४ येथे विक्रम बारच्या विरुद्ध दिशेच्या मार्गावर चालत्या गाडीवर मोठे झाड कोसळल्याने सायंकाळी दुर्घटना घडली. या वेळी गाडीमध्ये चौघेजण होते.

अपघातात गाडीमधील एकाच्या डोक्याला मार लागला असल्याने जखमीला एमजीएम वाशी रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शी महादेव पवार यांनी दिली. दुभाजकामधील झाड कोसळल्यामुळे ही घडली असून नशीब बलवत्तर म्हणून इतरांचे प्राण वाचले असल्याचे चित्र आहे.

## निवडक

### पनवेलमध्ये 'गाथा पलुस्करांची'

**पनवेल :** पनवेल कल्चरल सेंटरच्या सभागृहात रविवार, दि. २० ऑगस्ट रोजी गाथा पलुस्करांची हा कार्यक्रम सायंकाळी ५.३० वा. होणारा आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत घरोघरी पोहचविण्याचा ध्यास घेतलेले आणि त्यासाठी आपले आयुष्य पणाला लावणारे ऋषितुल्य पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांचा २१ ऑगस्ट हा ९२ वा स्मृतिदिन, तर १७ ऑगस्ट हा १५१ वा जन्मदिन. याचे औचित्य साधून पनवेल कल्चरल सेंटर गेली अनेक वर्षे पं. विष्णु दिगंबर पलुस्कर ह्यांच्या स्मरणार्थ एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी करीत असते. ह्यावर्षी संस्थेने ज्येष्ठ संगीत अभ्यासक, गायिका आणि संगीत कला विहार मासिकाच्या माजी संपादिका माधवी नानल यांना आमंत्रित केले असून त्या पं. पलुस्कर यांच्या काही बंदिशी सादर करतील तसेच त्यांच्या अलौकिक कार्यावर प्रकाशझोत टाकतील. कार्यक्रम सर्व संगीतप्रेमींसाठी खुला आहे.

### जुईनगर येथे आज अण्णाभाऊ साठे जयंती

**नवी मुंबई :** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि श्रावण पोर्णिमा निमित्ताने मंगळवारी (दि. १ ऑगस्ट) सायंकाळी ६ वाजता विविध कार्यक्रमांचे आयोजन जुईनगर सेक्टर २३ येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन या ठिकाणी करण्यात आले असल्याचे कळविण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन प्रबुद्ध सेवा संघ आणि आमरपाली महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आला असून या वेळी धम्म देसना पूज्य भदंत विमलकीर्ती गुणसिरी यांचे प्रवचन त्यानंतर राजकुमार शिंदे यांचे प्रमुख व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर उपस्थित उपासक आणि उपासिका याना खीरदान वाटप होणार असल्याचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी कळवले आहे.

### 'वाढदिवसानिमित्त सेवाकार्य राबवा'

**नवी मुंबई :** आपल्या ४ ऑगस्ट रोजी येणाऱ्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छापर होर्डिंग, बॅनर लावू नयेत



तर सेवाकार्यात योगदान द्यावे, असे आवाहन नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी केले आहे. भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर हितचिंतक, मित्रमंडळींनी वाढदिवसाला उत्सवी स्वरूप न देता विधायक उपक्रमांच्या माध्यमातून सेवाकार्यात योगदान द्यावे. वाढदिवसाचे शुभेच्छापर बॅनर आणि होर्डिंग लावू नयेत. तसेच शुभेच्छापर जाहिरातीदेखील देऊ नयेत. विधायक उपक्रमातून मिळणाऱ्या शुभेच्छाच माझ्यासाठी लाखमोलाच्या असणार आहेत, असे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी म्हटले आहे.

# नवी मुंबईत घरफोडी; लाखोंची चोरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील कोपरी गावात राहणारे देविदास भोईर हे कामानिमित्त सासुरवाडीत गेले होते. हि संधी साधून चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडी कोयंडा तोडून चोरी केली आहे. चोरट्यांनी दागिने आणि रोकडची शोधाशोध करताना डाळींचे व धान्यांचे डबे हि रिकामे केले. एकूण दोन लाख ७५ हजार रुपयांच्या ऐवजावर चोरांनी डल्ला मारला.

कोपरी गावात ठाकूर आळी येथे देविदास भोईर हे राहतात. २८ तारखेला ते कामावर गेले तर, त्यांच्या घरातील अन्य सदस्य त्यांच्या पत्नीच्या माहेरी उलवे येथे गेले. त्याच दिवशी संध्याकाळी देविदास पाच वाजता थेट सासुरवाडीला गेले व रात्री तेथेच सर्वांनी मुक्काम केला, मात्र ३० तारखेला दुपारी ३ च्या सुमारास कोपरीतील घरी काम करणाऱ्या महिलेचा फोन आला व तिने घराचा कडी कोयंडा तोडला असून आतील सामान अस्ताव्यस्त पडले असल्याची माहिती दिली. हि माहिती मिळताच सर्वजण कोपरी येथे आले. घरातील दागिने, रोकड व लॅपटॉप आढळून आला नाही. त्यामुळे चोरट्याने घरात चोरी केल्याचे समोर आले. घरातील वस्तूंची पाहणी केली असता दागिने व लॅपटॉप असा एकूण २ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. या बाबत एपीएमसी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात घरफोडीचा गुन्हा नोंद केला आहे.

**पाळत ठेऊन चोरीची शक्यता**

गावठाणात राहणारे जेष्ठ नागरिक आजही दागदागिने धान्यात लपवून ठेवतात हि बाब चोरट्याला माहिती असल्याने त्याने केवळ कपाटच नाही तर डाळी आणि धान्यांची डब्यातही दागिन्यांची शोधाशोध केली. विशेष म्हणजे घरातील कपाटात अनेक सोन्याप्रमाणे दिसणारी बनावट दागिणेही होते मात्र चोराने ती नेली नाहीत. त्यामुळे चोर अट्टल असून पाळत ठेऊन चोरी केली असावी, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# भाजप महिला मोर्चातर्फे इर्शाळवाडी येथे मदत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाजप नवी मुंबई महिला मोर्चा आणि युवती मोर्चाच्या माध्यमातुन इर्शाळवाडी येथील दुर्घटनाग्रस्त आपद्ग्रस्तांना मदतीचा एक हात पुढे करण्यात आला आहे.



नवी मुंबई अध्यक्षा दुर्गा ढोक आणि युवती अध्यक्षा सुहासिनी नायडू यांच्या पुढाकाराने इर्शाळवाडी दुर्घटनेत बचावलेल्या आपदग्रस्तांना घरगुती साहित्य, अन्न धान्य, मुले महिला आणि पुरुषांना कपडे वाटप तसेच जीवनावश्यक, अन्नपदार्थ वाटप करण्यात आले.

या वेळी नवी मुंबई अध्यक्षा दुर्गा ढोक म्हणाल्या की, इर्शाळवाडीतील दुर्घटना अतिशय वाईट असून त्यांच्या पुनर्वसनासाठी शासन कटिबद्ध आहे. या दुर्घटनेत आपद्ग्रस्तांना याना मदतीचा हात द्यावा म्हणुन भाजप नवी मुंबईच्या वतीने आम्ही प्रयत्न केला आहे.

या विधायक उपक्रमासाठी नवी मुंबई उपाध्यक्ष विजया ताई, महामंत्री उज्वला जगताप, कल्पना छत्रे, छाया खटकर, वॉर्ड अध्यक्ष शीतल भोईर, सुवर्णा हसमनी, कोमल खिलारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# नवी मुंबईत १५० युवांच्या माध्यमातून वृक्षारोपण उपक्रम



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जगद्गुरु नरेन्द्र महाराज भक्त सेवा मंडळ, नवी मुंबई आयोजित युवा सेना अंतर्गत रविवारी नवी मुंबई मनपा संत शिरोमणी तुकाराम महाराज उद्यान (सेक्टर ७, सानपाडा) येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाला मंडळाचे माजी जिल्हाअध्यक्ष महेश बांद्रे व नरेश साखरे, अध्यात्मिक प्रमुख मिनाक्षी हिलाल, संजय देशमुख, प्रभाकर भुजबळ, सचिन खिरीट, नेरूळ तालुका प्रमख कृष्णाप्पा भंडारी, कोपरखैरणे प्रमुख विलास सावळे, युवा शिबिर शुभम ढवळे, कार्यवाहक महादेव ढवळे, सर्व युवा तसेच युवती यांनी उपस्थिती दाखवली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृष्णाप्पा भंडारी व समीर खाटपे मोलाचे सहकार्य केले.

# 'पिल्लई'च्या विद्यार्थ्यांकडून एटीव्ही बाईकची निर्मिती

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी येथील महात्मा एज्युकेशन सोसायटी अंतर्गत पिल्लई एचओसीमधील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्टारकर्स मोटारस्पोर्ट्स या विद्यार्थी गटाने एटीव्ही क्वाड बाईकची मोठ्या कुशलतेने निर्मिती केली असून भव्य अनावरण पिल्लईचे सिईओ सोहळा डॉ. के. एम. वासुदेवन यांच्या हस्ते रसायनीत झाला.



या वेळी पिल्लई महाविद्यालयाच्या जनसंपर्क अधिकारी (पी. आर) डॉ. निवेदिता श्रेयांश, रसायनी डेप्युटी सीईओ डॉ. लता मेनन, प्राचार्य डॉ. जगदीश बाकल, प्राचार्य डॉ. अमर मांगे उपस्थित होते. अनावरण सोहळ्यानंतर टिमचे अनुभवी रायडर्सनी ए.टी.व्ही बाईकचे प्रभावशाली प्रदर्शन करून त्या बाईकची पात्रता दाखवण्यात आली. बाईक उद्घाटन झाल्यानंतर चीखळात, पाण्यातून, डोंगरातून हि क्वाड बाईक चालत असल्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

'स्टारकर्स मोटरस्पोर्ट' ही पिल्लेज एच.ओ. सी इंजिनियरींग व अभियांत्रिकी कॉलेजची एक अधिकृत टीम असून ही बहुविद्याशाखीय टीम एफ-३- कॅटेगरीची रेस वाहने निर्माण करते. महाविद्यालयाचे सीईओ डॉ. के. एम वासुदेवन पिल्ले, डेप्युटी सीईओ डॉ. लता मेनन, पीआर हेड निवेदिता श्रीयांश, प्राचार्य डॉ. जे. डब्लू बकाल, स्टारकर्सचे सल्लागार प्रो. के. एस. अनिश आणि प्रो. आदित्य शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली यांच्या सर्वतोपरी मदतीने २५० सीसीएटीव्ही क्वाड बाईकची निर्मिती केली. २०२२ साळीही तामिळनाडू येथील मदुराई येथे या टीमने प्रभावशाली प्रदर्शन करून संपूर्ण भारतातून दुसरा क्रमांक मिळवीला असून नऊ चषक वेगवेगळ्या स्पर्धेत मिळविले आहेत.

दरम्यान, ३ ते ७ ऑगस्टदरम्यान सागर इन्स्टीटच्यूट ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी, भोपाळ येथे होणाऱ्या स्पर्धे साठी ही टीम आपल्या क्वाड टॉक डिजाइन चॅलेंजच्या ९व्या हंगामाची आतुरतेने वाट पाहत आहे. मागील वर्षी भारतात रसायनीतील पिल्लईच्या विद्यार्थ्यांनी दुसरा क्रमांक पटकावला होता. यावर्षी होणाऱ्या स्पर्धेत भारतातून पहिला नंबर पटकाविण्याचा मानस आहे.

# दिशा महिला मंचतर्फे श्रावणरंग कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

दिशा महिला मंच आयोजित श्रावणरंग कार्यक्रमाचे आयोजन खांदा कॉलनी येथील बेलेझ्झा हॉल येथे करण्यात आले होते. मंगळागौरीचा जागर करूया हे ब्रीदवाक्य घेऊन 'स्त्री' विषयावर सामाजिक संदेश देऊन मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण २० ग्रुप सहभागी झाले होते. बाईपण जगत असतानाचे अनेक पैलू प्रत्येक ग्रुपमधून दाखविण्यात आले होते.



या कार्यक्रमास आर. के. ग्रुप चे डायरेक्टर राजेंद्र कोळकर, रांगोत्सव सेलेब्रेशनचे डायरेक्टर संग्राम दाते, मॅजिक पिटारा स्कूलचे दीपक कपूर व राजेश्री कपूर, ओम डेंटल क्लीनिक च्या डॉ. स्वाती वारे, शर्वरी इंटरप्रायजेसच्या शर्वरी पाटने, ग्लोरी ब्युटी पार्लरच्या पूजा कुटे, व्हॅल्यू ऑफ स्माईल फॉउंडेशनच्या हरजींदर कौर, हर्ब अँड ग्लोबचे कल्पेश सोमैय्या व मनिषा सोनवणे तसेच प्रतीक पोटोग्राफर चे प्रतीक चव्हाण, विनस वूमन्स हॉस्पिटल व फ्रोजन फूड च्या अश्विनी ढोके या मान्यवरांचे विशेष सहकार्य मिळाले. तसेच या मान्यवरांकडून दिशा व्यासपीठामार्फत घेण्यात आलेल्या या स्पर्धेचे विशेष कौतुक झाले.

सामाजिक संदेश देऊन घेण्यात आलेल्या या स्पर्धेत डॉक्टर टीमने मुलगी झाली हो विषयावर सामाजिक संदेश देऊन माणिकर्णिक ग्रुपने प्रथम क्रमांक पटकवला, स्त्री व तिचे अस्तित्व सादर करत स्त्री शक्ती ग्रुप ने दुसरा क्रमांक पटकवला व देशातील स्त्री शक्तीला प्रणाम करत अभुदया ग्रुपने तिसरा क्रमांक पटकवला तसेच उत्तेजनार्थ आकांक्षा ग्रुप व हिरकणी ग्रुपने क्रमांक पटकवला. मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सर्व स्पर्धेकांना सन्मानित करण्यात आले. भव्य दिव्य अशा स्पर्धेसाठी नृत्यांगना मिताली सुभाष पारंगे व बॉलीवूड कोरिओग्राफर सचिन भगत यांनी उत्तमरित्या परीक्षण केले.

या वेळी दिशा व्यासपीठाच्या संस्थापक निलम आंधळे यांनी महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा त्यांचा व्यासपीठावरील आत्मविश्वास, मनोधैर्य वाढावं यासाठी दिशा व्यासपीठ नेहमीच प्रयत्नशील राहील, असे सांगितले. सूत्रसंचालन स्वाती यांनी केले तर महिलांचे स्पर्धेची तयारी करताना अनुभवलेले किस्से सांगत हसत खेळत वातावरणात व्यासपीठाच्या उपाध्यक्षा विद्या मोहिते यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळली.

# महसूल सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

## आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांची माहिती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महसूल विभागामार्फत राज्यात १ ऑगस्ट हा महसूल दिन साजरा करण्याबरोबरच १ ते ७ ऑगस्ट २०२३ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या सात दिवसांत कोकणातील प्रत्येक जिल्ह्यात शासनाने दिलेल्या सुचनांबरोबरच नाविण्यपूर्ण उपक्रम राबवावेत असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिले आहेत.

१ ऑगस्ट रोजी महसूल दिन आणि महसूल सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे. २ ऑगस्ट रोजी शालेय विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी आवश्यक अशा 'युवा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ३ ऑगस्ट रोजी अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ, भूस्खलन, अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक आपत्तीत नागरिकांना मिळणारी नुकसान भरपाई, अशा परिस्थितीत घ्यावयाची काळजी या विषयांवर आधारीत 'एक हात मदतीचा' या कार्यक्रमाचे आयोजन. ४ ऑगस्ट रोजी महसूल अदालीतींमधील प्रलंबित प्रकरणे, सलोखा योजना, जमिनी विषयक वाद, आपले सरकार या पोर्टलवर प्राप्त तक्रारींचा निपटारा अशा विषयांशी संबंधित 'जनसंवाद' या कार्यक्रमाचे आयोजन. ५ ऑगस्ट रोजी सीमेवर तैनात सैनिक तसेच शहिदांच्या कुटूंबीयांना मदत, त्यांना जमीन वाटप, संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी 'सैनिक हो तुमच्यासाठी' या कार्यक्रमाचे आयोजन. ६ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील जिल्हयात कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित बाबी निकाली काढण्यासाठी 'महसूल संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांशी संवाद' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ७ ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहा दरम्यान केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेण्यासाठी 'महसूल सप्ताह सांगता समारंभ' आयोजित करण्यात आला आहे.

### विभागानुसार अधिकाऱ्यांची नियुक्ती

*कोकण विभागात हा महसूल सप्ताह यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी उपायुक्त दर्जाच्या नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई शहर साठी उपायुक्त (महसूल) कोकण विभागासाठी विवेक गायकवाड, मुंबई उपनगर साठी उपायुक्त (रोहयो) कोकण विभाग अजित साखरे, ठाण्यासाठी उपायुक्त (सामान्य प्रशासन) कोकण विभाग मनोज रानडे, पालघरसाठी उपायुक्त (पुरवठा) कोकण विभाग लिलाधर दुफारे, रायगडसाठी उपायुक्त (पुनर्वसन) कोकण विभाग रिता मैत्रेवार, रत्नागिरीसाठी उपायुक्त (नगरपालिका) कोकण विभाग रवींद्र जाधव, सिंधुदूर्गसाठी उपायुक्त (विकास आस्थापना) कोकण विभाग मिनल कुटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.*

# न्यूयॉर्क संघाला एमएलसीचे विजेतेपद

## निकोलस पूरनचे वादळी शतक; ब्रेविसची अधर्शतकी खेळी

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अमेरिकेतील मेजर लीग क्रिकेटच्या (एमएलसी) पहिल्या पर्वात मुंबई इंडियन्स न्यूयॉर्कच्या संघाने अंतिम सामन्यात सिएटल ऑर्कास संघाचा सात गडी राखून पराभव करून विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात १८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूयॉर्क संघाचा कर्णधार निकोलस पूरनने ५५ चेंडूंत नाबाद १३७ धावांची तुफानी शतकी खेळी करीत संघाला विजय मिळवून दिला. न्यूयॉर्क संघाने हे लक्ष्य अवघ्या १६ षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले. या विजयाने आता मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात नऊ ट्रॉफी जमा झाल्या आहेत.




लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूयॉर्कच्या संघाची सुरुवात चांगली झाली नाही. डावाच्या पहिल्याच षटकात शून्य धावसंख्येवर स्टीव्हन टेलरच्या रूपाने संघाला पहिला धक्का बसला. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या कर्णधार निकोलस पूरनने येताच आपले इरादे स्पष्ट केले. एका टोकाकडून सातत्याने आक्रमक धावा करणाऱ्या निकोलस पूरनने सहा षटकांतच संघाची धावसंख्या ८० धावांपर्यंत नेली.

पूरनने सिएटल ऑर्कासच्या गोलंदाजांवर एका टोकाकडून आक्रमण सुरूच ठेवले. त्याने डेवाल्ड ब्रेविससोबत तिसऱ्या विकेटसाठी ४४ चेंडूंत ७५ धावांची भागीदारी केली. एमआय न्यूयॉर्कला या सामन्यात तिसरा धक्का १३७ धावांवर ब्रेविसच्या रूपाने बसला, जो २० धावा करून धावबाद झाला. यानंतर पूरनने शतक पूर्ण करून संघाला विजय मिळवून दिला. त्याच्या बॅटने ५५ चेंडूंत १० चौकार आणि १३ षटकारांच्या मदतीने नाबाद १३७ धावांची खेळी साकारली.

तत्पूर्वी सिएटल संघासाठी सलामीवीर क्विंटन डिकॉकने ५२ चेंडूंत ८७ धावांची धडाकेबाज खेळी केली. यात डिकॉकने चार षटकार आणि नऊ चौकार लगावले. त्याच्याशिवाय एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. न्यूयॉर्क संघाकडून ट्रेंट बोल्ट आणि राशिद खान यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या.

# भारत-विंडीज संघांमध्ये आज निर्णायक वनडे

**त्रिनिदाद : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतील तिसरा व अंतिम सामना मंगळवारी (दि. १) खेळला जाणार आहे. या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला असल्याने निर्णायक सामन्यात कोण बाजी मारणार याकडे लक्ष लागले आहे.



पहिल्या वनडेत टीम इंडियाने वेस्ट इंडिज पाच विकेट्स राखून निसटता विजय मिळवला. त्याचबरोबर मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. ११५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने बॅटिंग ऑर्डरमध्ये बरेच प्रयोग केले होते. भारताकडून इशान किशनने अर्धशतक झळकावले. त्याचवेळी कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजा यांनी गोलंदाजीत अनुक्रमे चार आणि तीन असे बळी टिपले.

पावसाने खोडा घातलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजने सहा गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर भारताने प्रथम फलंदाजी करताना १८१ धावा केल्या होत्या. विंडीजने चार विकेट्सच्या मोबदल्यात १८२ धावा केल्या व सामना जिंकला. भारताने हा सामना रोहित शर्मा, विराट कोहली यांसारख्या दिग्गजांच्या अनुपस्थितीत खेळला. विंडीजच्या शाई होपने कर्णधारपदाला साजेशी खेळी केली. त्याने नाबाद ६३ धावा केल्या तसेच केसी कार्टी ४८ धावा करून नाबाद राहिला. आता तिसरा सामना जो संघ जिंकेल तो मालिकाही जिंकेल.


# वर्ल्डकप : सुरक्षेच्या कारणास्तव भारत वि. पाकिस्तान सामन्याची तारीख बदलली?

## लवकरच होणार घोषणा

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील विश्वचषक स्पर्धेच्या सामन्याची सर्वांनाच प्रतीक्षा आहे. वेळापत्रकानुसार उभय संघांमध्ये १५ ऑक्टोबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सामना होणार होता, मात्र नवरात्रीमुळे त्यात बदल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार आता हा सामना १४ ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे. तारखेतील बदलाबाबत अलिकडेच सुरक्षा यंत्रणांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती.

अहमदाबादमधील स्टेडियमची क्षमता एक लाख असून नवरात्रीचा



पहिला दिवस असल्याने गुजरातमध्ये अनेक ठिकाणी गरब्याचे कार्यक्रम होतात. अशा परिस्थितीत स्टेडियममध्ये मोठ्या प्रमाणावर दिल्या जाणाऱ्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. बीसीसीआय आणि आयसीसी लवकरच नवीन तारखेची घोषणा करू शकतात.

टीव्ही टुडेच्या बातमीनुसार, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना आता एक दिवस आधी १४ ऑक्टोबरला खेळवला जाऊ शकतो. याशिवाय आणखी अनेक सामन्यांच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतात. अलीकडेच बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी सांगितले होते की, तीन देशांनी आयसीसीला पत्र लिहून वेळापत्रकात बदल करण्याची मागणी केली होती, मात्र सामन्याच्या ठिकाणी कोणताही बदल करण्यात आलेला नाही. एकदिवसीय विश्वचषकाचे वेळापत्रक पाहिल्यास ५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर या कालावधीत सामने खेळवले जाणार आहेत. यात एकूण १० संघ प्रवेश करीत असून ४८ सामने खेळवले जाणार आहेत. याबाबतची अधिकृत माहिती लवकरच दिली जाणार आहे.

# युवराज सिंगच्या सहा षटकारांमुळेच मी घडलो!

## स्टुअर्ट ब्रॉडची प्रांजळ कबुली

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा वेगवान गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉडने निवृत्ती जाहीर केली आहे. अ‍ॅशेस मालिकेत निवृत्तीची घोषणा केल्यानंतर ब्रॉडने अनेक संस्मरणीय क्षणांबद्दल सांगितले. त्यात युवराज सिंगच्या सहा षटकारांचाही समावेश होता. २००७च्या टी-२० विश्वचषकात युवराज सिंगने ब्रॉडला सहा षटकार ठोकले होते. यावर ब्रॉड म्हणाला की, आज तो ज्या प्रकारचा खेळाडू घडला आहे, तो त्या सहा षटकारांमुळेच.

युवराजच्या सहा षटकारांवर ब्रॉड पत्रकार परिषदेत म्हणाला, त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात हा एक कटू धडा होता या घटनेनंतर संघातून मला काढून टाकण्यात आले होते, मात्र असे वाटते की, याचमुळे मला स्पर्धात्मक बनण्यास बळ मिळाले. आयुष्यात खूप धक्के पचवण्याची शक्ती मिळाली. चांगल्या लोकांना क्रिकेटमध्ये काहीतरी करून दाखवण्याची संधी देण्यासाठी वाईट दिवस आणि खराब कामगिरीतून जावे लागते. त्यावर ते कशी मात करतात आणि पुढे जातात हे फार महत्त्वाचे असते. तो साहजिकच खूप कठीण दिवस होता. मी त्या वेळी २१-२२ वर्षांचा होतो. मला त्यातून खूप काही शिकायला मिळाले.


॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



**स्व. लक्ष्मण गोवर ठाकूर**

मृत्यु :- मिती अधिक श्रावण शु. ४, शके १९४५, शुक्रवार दि. २१/०७/२०२३ रोजी

उत्तरकार्य विधी

मंगळवार दि. ०१/०८/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता (राहत्याघरी)

| दिनांक | कार्यक्रम |
| --- | --- |
| ०१/०८/२०२३ (मंगळवार) सकाळी १० ते १२ | श्री गुरुकृपा भजन मंडळ, कोपर, बुवा -सौ. सुप्रिया समीर घरत, पखवाज-श्री. तुषार घरत, तबला -कु. मिलींद कडू, टाळ -कु. उमेश गावंड. |

शोकाकुल
**समस्त ठाकूर परिवार**

पत्ता: मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com